POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

मराठी एकीकरण बातमीपत्र

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-३५७ ● मुंबई, सोमवार, २८ जूलै २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

रोटरी क्लब ऑफ देवळाली आणि आश्रय सामाजिक-सांस्कृतिक शैक्षणिक ट्रस्ट ठाणे यांच्या वतीने थॅलेसेमिया जनजागृती व्याख्यान

■नाशिक।संपादक सौ.प्रीती नाईक,

ठाणे जिल्ह्यातील देवळाली येथील मेसोनिक लॉज, मिलिटरी कॅम्पसमध्ये रोटरी क्लब ऑफ देवळाली आणि आश्रय ट्रस्ट आयोजित ''Awareness Drive'' कार्यक्रमात थॅलेसेमिया रोगाविषयी जनजागृती केली गेली. कार्यक्रमाचे मुख्य वक्ते, प्रसिद्ध रक्तविज्ञान संशोधक आणि आरोग्य विभागाचे सचिव प्रा. प्रकाश पांगम (आश्रय ट्रस्ट) होते.

प्रा. पांगाम सरांनी ठोस तथ्यांसह थॅलेसेमिया मायनर आणि मेजर यातील फरक स्पष्ट केला. त्यांनी सांगितले की, एका पालकाला थॅलेसेमिया मायनर असल्यास संतती सामान्य असते, परंतु दोन्ही पालक मायनर असतील तर नवजात बाळ थॅलेसेमिया मेजर असू शकते. त्यामुळे लग्नापूर्वी उइउ रक्त तपासणी करणे अत्यंत आवश्यक आहे, असे त्यांनी आवाहन केले. ह्ज्योतिषाच्या कुंडल्यांपेक्षा उइउ रिपोर्ट अधिक विश्वासार्ह!,ह्व अशी जोरदार अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. तसेच, मराठी, गुजराती, सिंधी आणि आदिवासी समाजांसह विविध महाविद्यालयांमध्ये त्यांनी केलेल्या अभ्यासातून मिळालेल्या निष्कर्षांवरून त्यांनी विवाहपूर्व रक्त तपासणीच्या गरजेवर लक्ष वेधले.

नाशिक आणि मुंबई येथील Nirmala Niketan, SNDT आणि Nair College सोबत ३० वर्षांहून अधिक काळ संलग्न असलेले पंगम सर, हजारो तरुणांना थॅलेसेमिया विषयी जागरूक केले आहेत. त्यांच्या समाजकायार्चे विशेष उदाहरण म्हणजे, प्रसिद्ध कलाकार पंकज उधास यांच्या कार्यक्रमातून जमा केलेल्या निधीच्या माध्यमातून ९ कर्करोग रुग्णांसाठी मदत, आणि टाटा कॅन्सर हॉस्पिटलमध्ये केलेली सेवा. डायसवर उपस्थित असंख्य मान्यवरांमध्ये सहाय्यक पी.पी. फ्ल्ल. मुरली राघवन, अध्यक्ष डॉ. पुष्कर जोशी तथा सचिव एस.एन. मोरे यांचा समावेश होता. कार्यक्रमाअंती फ्ल्ल. श्रीमती शिरगावकर यांनी प्रभावी आभारप्रदर्शन केले.

कार्यक्रमात पंगम सरांचे मोलाचे योगदान आणि समाजकल्याणासाठी केलेल्या कार्याचे राज्यस्तरीय मानकरींनी सन्मान करावे, अशी उपस्थितांची सर्वसाधारण अपेक्षा होती. या जनजागृती मोहिमेतून विवाहपूर्व थॅलेसेमिया तपासणी करणाऱ्या युवक-युवतींची जागरूकता वाढेल आणि पुढील काळात आरोग्यपूर्ण भेटी आणि निरोगी समाजाकडे वाटचाल होईल, अशी आशा व्यक्त केली गेली.

'महाराष्ट्राच्या मनात काय ते तुम्हाला दिसेलच'

उद्धव-राज भेटीवर फडणवीसांचा इलेक्शन अजेंडा

नेमकं काय म्हणाले फडणवीस?

मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी आज मातोश्री येथे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. याबाबत विचारले असता उद्धव ठाकरेंना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी राज ठाकरे मातोश्रीवर गेले चांगली गोष्ट आहे यात राजकारण कशासाठी पहायचं आपण. आमच्याही उद्धवजींना शुभेच्छा आहेत सगळ्यांच्याच आहेत. जन्मदिनाच्या शुभेच्छा द्यायला गेले तर त्यात राजकारण पाहणं हे काही योग्य नाही असं मला वाटतं.

■मुंबई । प्रतिनिधी,

राज्याच्या राजकारणात आज एक मोठी घडामोड घडली. मनसेप्रमुख राज ठाकरेयांनी मातोश्रीत जाऊन उद्धव ठाकरेंना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. दोन्ही बंधू पुन्हा एकत्र आल्याचे चित्र राज्याने पाहिलं. उद्धव ठाकरेंनी सांगितलं की राज ठाकरेंनी शुभेच्छा दिल्या वाढदिवसाचा आनंद द्विगुणित झाला. तर दुसरीकडे महाराष्ट्राच्या मनातलं घडलं अशी चर्चा सुरू झाली. यानंतर प्रसारमाध्यमांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना याच मुद्द्यावर विचारलं. त्यावर फडणवीसांनी ठाकरेंना शुभेच्छा तर दिल्याच पण महाराष्ट्राच्या मनात काय आहे हे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही दिसेल असं आव्हानही दिलं. या शुभेच्छानंतर महाराष्ट्राच्या मनात असलेलं घडत आहे अशा चर्चा सुरू झाल्या आहेत. यावर बोलताना फडणवीसांनी उद्धव ठाकरेंना खोचक टोला लगावला. महाराष्ट्राच्या मनात काय आहे हे तुम्हाला विधानसभेच्या निवडणुकीत दिसलं. आता महाराष्ट्राच्या मनात काय आहे हे तुम्हाला आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही दिसेल. आता काही पक्षांच्या नेत्यांच्या मनात काय आहे ते महाराष्ट्राच्या मनातलं आहे असं म्हणणं काही योग्य नाही. फार मोठं स्टेटमेंट होईल ते असे फडणवीस म्हणाले. मंत्र्यांना अडचण असेल तर माज्याशी बोला पण.. समाजकल्याण मंत्री संजय शिरसाट आणि राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्यात वाद उफाळून आला आहे. यावर बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी दोन्ही मंत्र्यांचे कान टोचले. अशा प्रकारे पत्र लिहून वाद कुणीही तयार करू नये. मंत्र्यांनी आपापसात बोलावं. त्यांना काही अडचणी असतील तर त्यांनी मला येऊन सांगाव्यात म्हणजे त्या अडचणी आपल्याला दूर करता येतील. मंत्री आणि राज्यमंत्री एकाच सरकारचे घटक आहेत. सगळे अधिकार मंत्र्यांकडे असतात. मंत्री जे अधिकार देतात ते राज्यमंत्र्यांचे अधिकार असतात. राज्यमंत्र्यांना बैठका घेण्याचा अधिकार नाही असे मानणेही योग्य नाही. राज्यमंत्र्यांना बैठका घेण्याचा पूर्ण अधिकार आहे. पण अशा प्रकारच्या बैठकांत काही धोरणात्मक निर्णय असतील तर ते निर्णय मंत्र्यांशी बोलल्याशिवाय घेता येत नाहीत. जर घेतले तर त्याला मंत्र्यांची मान्यता घ्यावी लागते. मंत्री आणि राज्यमंत्री दोघांनीही सामंजस्य दाखवायला पाहिजे. काही अडचण असेल तर माज्याशी बोललं पाहिजे.

ठेकेदारांचे पैसे फेडताना 'फडणवीस सरकार' घाईला येणार?

देणेकरांची यादी मारुतीच्या शेपटीपेक्षा मोठी

■मुंबई । प्रतिनिधी,

लाडकी बहीण योजनेमुळे महाराष्ट्र सरकारच्या तिजोरीवर ताण येत आहे. त्यामुळे नगरविकास विभाग, जलसंपदा विभाग, जलजीवन मिशन योजना, सार्वजनिक बांधकाम विभागातील ठेकेदारांची ९० हजार कोटींची थकबाकी आहे. सांगली जिल्ह्यातील तांदुळवाडी येथील तरुण ठेकेदार हर्षल पाटील यांनी नुकतीच जीवनयात्रा संपवली. सरकारकडून जलजीवन मिशनचे पैसे थकल्याने त्यांनी टोकाचं पाऊल उचललं असा, आरोप कंत्राटदार संघटनेकडून केला जात आहे. याआधी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जयंत पाटील यांनीही पावसाळी अधिवेशनात सरकारने कंत्राटदारांची देणी द्यावीत अन्यथा त्यांना आत्महत्या कराव्या लागतील, अशी चिंता व्यक्त केली होती. आता फडणवीस सरकारकडे केवळ जलजीवन मिशनच नाही तर इतर विभागांतील ठेकेदारांची थकबाकी असल्याचे समोर आले आहे. सध्या सरकारकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे ४६ हजार कोटी, जलसंपदा

विभागाचे १९ हजार ७०० कोटी, जलजीवन मिशनचे १८ हजार कोटी, नगरविकास विभागाचे १७ हजार कोटी, ग्रामविकास विभागाचे ८ हजार कोटी आणि इतरही विभागांचे पैसे मोठ्या प्रमाणात थकले आहेत. थकलेल्या रक्कमेचा आकडा ९० हजार कोटींच्या वरती असल्याचे सांगितले जाते. विशेष म्हणजे यावरून कंत्राटदारांनी सरकारविरोधात न्यायालयात जाण्याचा इशारा दिला होता. तसेच बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया या कंत्राटदार संघटनेने सरकारला कायदेशीर नोटीस बजावली आहे. पण अजूनही सरकारकडून संघटनेला थांबा असेच उत्तर मिळाले आहे. थोडक्यात सरकारला ही देणी देण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागणार आहे. शिवेंद्रराजे भोसले नाराज? राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्या खात्याच्या दीड लाख ठेकेदारांची तब्बल ४६ हजार कोटींची देणी थकबाकी आहे. हीच थकबाकी मिळावी यासाठी शिवेंद्रराजेकडे मंत्रालयात आणि बंगल्यावर देणेकऱ्यांची रांग लागल्याची माहिती मिळत आहे. या थकबाकीमुळे मंत्री शिवेंद्रराजेंना पुढील किमान साडेतीन ते चार वर्षे काहीही नवीन करता येणार नसल्याने ते नाराज झाले आहेत. लाडकी बहीण योजनेमुळे तिजोरीवर ताण? राज्यात सध्या सुरू असलेल्या लाडकी बहीण योजनेमुळे अनेक विभागाचा निधी वळवला जात आहे. यावरून विविध मंत्र्यांनी थेट नाराजी बोलून दाखवली आहे. विरोधकांसह सत्ताधारी ही लाडकी बहिणीमुळे तिजोरीवर लोड येत असल्याचे बोलत आहेत. याच लाडकी बहीण योजनेमुळे ठेकेदारांची देणी थकली असल्याचे बोलले जाते.

'चोल साम्राज्याचा काळ हा भारताच्या सुवर्णयुगांपैकी एक होता' : पंतप्रधान नरेंद्र मोदी

■तामिळनाडू। प्रतिनिधी,

गंगाईकोंडा चोलापुरम मंदिर हे तामिळनाडूच्या अरियालूर जिल्ह्यात स्थित एक ऐतिहासिक मंदिर आहे, जे ११ व्या शतकात चोल सम्राट राजेंद्र चोला प्रथम यांनी बांधले होते. हे मंदिर युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळ ग्रेट लिविंग चोला मंदिरांचा भाग आहे. या मंदिरात आज राजेंद्र चोला प्रथम यांच्या जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची विशेष उपस्थिती लाभली.

या दरम्यान नरेंद मोदी यांनी भारतात शेकडो वषार्पूर्वी होऊन गेलेल्या चोल सम्राज्याविषयी आणि त्यांच्या ऐतिहासिक वास्तूंविषयी आपले मत व्यक्त केले. यावेळी कार्यक्रमाला संबोधित करताना ह्लचोल साम्राज्याचा काळ हा भारताच्या सुवर्ण युगांपैकी एक होता असे म्हणत भारताच्या सुवर्ण ऐतिहासिक संस्कृतीचे गुणगान गायले. पंतप्रधान मोदी काय म्हणाले? पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गंगाईकोंडा चोलापुरम मंदिरात महान चोल सम्राट राजेंद्र चोला प्रथम यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमाला संबोधित केले. या दरम्यान ते म्हणाले की हे मंदिर एक प्रकारे महान चोल राजाची पूजनीय भूमी आहे. इतिहासकारांचा असा विश्वास आहे की चोल साम्राज्याचा काळ हा भारताच्या सुवर्णयुगांपैकी एक होता. चोल साम्राज्याने भारताला लोकशाहीची जननी म्हणण्याची परंपरा देखील पुढे नेली. इतिहासकार लोकशाहीच्या नावाखाली ब्रिटनच्या मॅग्ना कार्टाबद्दल बोलतात. परंतु अनेक शतकांपूर्वी चोल साम्राज्यात लोकशाही पद्धतीने निवडणुका होत असत. इतर ठिकाणे जिंकल्यानंतर सोने, चांदी किंवा पशुधन आणणाऱ्या अनेक राजांबद्दल आपण ऐकतो. परंतु राजा चोलाने गंगेचे

पाणी आणले. भगवान बृहदेश्वर मंदिरात पूजा पंतप्रधान मोदींनी रविवारी चोलकालीन भगवान बृहदेश्वर मंदिरात पूजा केली. यावेळी ते वैदिक आणि शैव तिरुमुराई जप तसेच प्रार्थना करताना दिसले. गंगेच्या पवित्र पाण्याने भरलेला कलश त्यांनी यावेळी अभिषेकासाठी आणला होता. हिंदू परंपरेनुसार वेष्टी (धोतर), पांढरा शर्ट आणि गळ्यात अंगवस्त्र परिधान करून त्यांनी मंदिराच्या आतील भागात प्रदक्षिणा घातली. पंतप्रधान मोदींनी चोल शैव धर्म आणि स्थापत्यशास्त्रावरील भारतीय पुरातत्व सर्वेक्षणाच्या प्रदर्शनालाही यादरम्यान भेट दिली. गंगाईकोंडा मंदिराचा इतिहास गंगाईकोंडा चोलापुरम मंदिर हे तामिळनाडूच्या अरियालूर जिल्ह्यात स्थित एक ऐतिहासिक मंदिर आहे, जे ११ व्या शतकात चोल सम्राट राजेंद्र चोला प्रथम यांनी बांधले होते. हे मंदिर युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळ ग्रेट लिविंग चोला मंदिरांचा भाग आहे, ज्यामध्ये तंजावरचे बृहदेश्वर मंदिर आणि दारासुरमचे ऐरावतेश्वर मंदिर देखील समाविष्ट आहे. हे मंदिर भगवान शिव यांना समर्पित आहे. त्याचे नाव गंगाईकोंडा चोलापुरम (गंगा जिंकणारा चोला) राजेंद्र चोलाच्या गंगा नदीवरील लष्करी विजयाचे स्मरण करते. गंगाईकोंडा चोलापुरम मंदिराचे मुख्य गर्भगृह ५५ मीटर उंच आहे. येथे १३.५ फूट उंच शिवलिंग आहे, जे दक्षिण भारतातील सर्वात मोठ्या शिवलिंगांपैकी एक आहे. मंदिराची रचना द्रविड शैलीची आहे, ज्यामध्ये गुंतागुंतीचे कोरीवकाम आणि शिल्पे आहेत, जी चोल कला आणि स्थापत्यकलेची उत्कृष्टता दर्शवते. हे मंदिर २५० वर्षे चोल साम्राज्याची राजधानी म्हणून काम करत होते आणि त्याचे बांधकाम इ.स. १०३५ मध्ये पूर्ण झाले. मंदिर संकुलात नंदी मंडप, अलंकार मंडप आणि महा मंडप असे अनेक मंडप आहेत. येथे दररोज चार पूजा होतात आणि महाशिवरात्रीसारखे वार्षिक उत्सव आयोजित केले जातात. मंदिर पर्यटकांसाठी सकाळी ५ ते दुपारी १२ आणि दुपारी ४ ते रात्री ९ पर्यंत खुले असते.

निशिकांत दुबे यांच्या पत्नीवर आर्थिक गैरव्यवहाराचा गुन्हा!

१०० कोटींच्या बँक कर्ज गैरव्यवहारात चौकशी... समर्थक देवता पांडे यांना अटक

■रांची । प्रतिनिधी,

भारतीय जनता पक्षाचे झारखंडमधील गोड्डा लोकसभा मतदारसंघाचे खासदार निशिकांत दुबे यांच्या पत्नी अनामिका गौतम यांच्याविरोधात कोट्यवधींच्या बँक कर्ज गैरव्यवहाराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मेडिकल कॉलेजसाठी बँकेकडून घेतलेले १०० कोटी रुपयांचे कर्ज थकवल्याच्या प्रकरणी ही गंभीर कारवाई करण्यात आली असून, त्यांच्या निकटवर्तीय समर्थक देवता पांडे यांना अटक करण्यात आली आहे.

खासदार निशिकांत दुबे आणि पत्नी अनामिका गौतम – आर्थिक गुन्ह्याच्या आरोपामुळे चर्चेत.

या कारवाईमुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. झारखंड विधानसभेतील विरोधी पक्षनेते बाबूलाल मरांडी यांनी यावर तीव्र प्रतिक्रिया नोंदवली आहे. ''अनामिका गौतम यांच्याविरोधात हा तब्बल ४७ वा गुन्हा आहे,'' असे त्यांनी 'फेसबुक पोस्ट'मधून म्हटले आहे. तसेच, यासंदर्भात त्यांनी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना पत्र लिहून याप्रकरणाची माहिती दिली आहे.

मरांडी यांनी आरोप केला की, काही अधिकाऱ्यांनी मुख्यमंत्र्यांना अंधारात ठेवून ही कारवाई केली असून, केवळ राजकीय सूड म्हणून कुटुंबीय व समर्थकांना लक्ष्य करणे हे लोकशाहीला धरून नाही. राजकीय लढाई थेट आणि मुद्देसूद असावी, सूडबुद्धीने व्यक्तींना लक्ष्य करणे हा दुर्दैवी प्रकार असून, अशा घटना रोखाव्यात, अशी अपेक्षा त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे व्यक्त केली आहे.

■मुंबई । प्रतिनिधी,

देशातील गरीब जनतेला २ वेळच खायला मिळावं यासाठी केंद्र सरकार कडून मोफत रेशन वाटप करण्यात येत. देशातील जवळपास ८० कोटी जनता रेशनचा लाभ घेते. यामाध्यमातून लोकांना गहू, तांदूळ सह इतर काही वस्तू मिळतात. मात्र आता रेशन कार्ड धारकांसाठी महत्त्वाची बातमी समोर येत आहे. जे रेशन कार्ड धारक सलग सहा महिने रेशनवरील धान्याचा लाभ घेत नाहीत त्यांचा लाभ सरकारकडून बंद केला जात आहे. यासाठी अन्न व नागरी पुरवठा विभागाकडून प्रत्येक सहा महिन्यांनी यादी पाठवली जात आहे. त्यामुळे जर तुम्हीही मागील ६ महिन्यापासून रेशन घेतलं नसेल तर तुमचंही रेशन इथून पुढे बंद होऊ शकते. ७% ते १८% कार्ड रद्द होऊ शकतात

केंद्र सरकारने २२ जुलै रोजी लक्ष्यित सार्वजनिक वितरण प्रणाली (नियंत्रण) सुधारणा आदेश, २०२५ अधिसूचित केला आहे. या अंतर्गत, ज्या रेशन कार्ड धारकांनी मागील ६ महिन्यांपासून रेशन घेतले नाही त्यांचे कार्ड सक्रिय राहणार नाहीत. त्यानंतर ३ महिन्यांत, घरोघरी पडताळणी आणि ई-केवायसीद्वारे पुन्हा पात्रता निश्चित केली जाईल. सरकारच्या या निर्णयानंतर किती कार्ड रद्द केले जातील हे चौकशीनंतरच स्पष्ट होईल. मात्र महाराष्ट्रात अंदाजे ७% ते १८% कार्ड रद्द होऊ शकतात असं बोललं जात आहे. अपात्र लोकांना या रेशन कार्ड यादीतून वगळणे हाच या निर्णयामागचा मुख्य उद्देश आहे. ज्या लोकांना रेशन वरील धान्याची गरज नाही अशा लोकांची ओळख पटवण्यासाठी आणि त्यांचा लाभ बंद करण्यासाठी सरकारने हे पाऊल उचललं आहे. उदाहरणार्थ, सोलापूर जिल्ह्यातील ५००० पक्ष जास्त रेशन कार्ड धारकांचा रेशनवरील धान्याचा लाभ गेल्या काही महिन्यांच्या काळात बंद करण्यात आला असल्याची माहिती प्रशासनाच्या माध्यमातून समोर आली आहे.त्यानंतर हि रेशनकार्ड सायलेंट समजून त्यांचं धान्य बंद करण्यात आलं आहे. सलग ६ महिने ज्यांनी रेशन घेतलं नाही त्यांना या धान्याची गरज नाही असं समजून हे धान्य बंद केलं जाणार आहे.

संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

भारताची व्यापार निश्चिती !

अमेरिकेचे सणकी डोक्याचे राष्ट्राध्यक्ष डॉनल्ड ट्रम्प यांनी मागील काही काळ आयात करावरून जग गाजवले आहे. अमेरिकेच्या या निर्णयामुळे जगभरातील देशांना मोठा आर्थिक दणका बसला. अमेरिकेने उतरती कळा लागलेले स्वतःचे 'महासत्ता' म्हणून असलेले अस्तित्व टिकवण्यासाठी चीनसारख्या प्रतिस्पध्यार्ला नमवण्यासाठी प्रयत्न चालवले आहेत. त्याच वेळी डॉलरचा जागतिक चलन म्हणून दर्जा जपण्यासाठी अमेरिकेची धडपड चालू आहेच. पालटत्या काळानुसार भारताच्या विकासाची उड्डाणे पहाता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी असलेल्या मैत्रीपूर्ण संबंधांनंतरही ट्रम्प यांनी भारतावरही मोठे आयात शुल्क लागू केले. भारत महत्त्वाचा सदस्य असलेल्या 'ब्रिक्स' संघटनेवर जरब बसवण्यासाठीही ट्रम्प आणि त्यांची अमेरिका प्रयत्नरत असल्याचे मागील दीड-दोन वर्षांतील घटनांवरून दिसून आले आहे. अशातच भारताने इंग्लंडशी 'मुक्त व्यापार करार' केला आहे, तसेच मालदीवलाही वठणीवर आणून व्यापारास भाग पाडत भारताचा 'ट्रेड' (व्यापार) 'सेट' (निश्चित) केला आहे. मागील ३ वर्षांपासून भारत आणि ब्रिटन यांच्यात चालू असलेल्या 'मुक्त व्यापार करारा'च्या संदर्भातील वाटाघाटींना यश आले असून दोन्ही देशांमध्ये प्रथमच सर्वांत मोठा व्यापार करार झाला. या अंतर्गत ब्रिटनमधून येर्णाया आणि भारतातून जार्णाया सामानावर आतापर्यंत लागू असलेला साधारणतः १५ टक्के कर १-२ टक्के म्हणजे नसल्यासारखा झाल्याने याचा थेट लाभ भारताच्या वस्त्रोद्योग, औषधनिर्मिती, रत्न आणि आभूषण क्षेत्र, अन्न प्रक्रिया उद्योग अन माहिती तंत्रज्ञान सेवांना होणार असून दोन्ही देशांमध्ये अनेक वस्तू स्वस्त होणार आहेत. हा व्यापार प्रतिवर्षी ३ लाख कोटी रुपयांनी वाढण्याचीही अपेक्षा आहे. अमेरिकेने ब्रिक्स संघटनेतील देशांना दिलेली चेतावणी असो वा वाढवलेले आयात शुल्क त्याचा थेट आणि मोठा परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर होऊ नये, याची पुरेपूर काळजी भारत घेत आहे. या पार्श्वभूमीवर डॉनल्ड ट्रम्प यांच्या '१० टक्के म्हणजेच नवे शून्य टॅरिफ' या धोरणाची चचार्ही चालू आहे. अमेरिकेने काही भागीदार राष्ट्रांसमवेत अशा स्वरूपाचे करार करतांना भारतावर अप्रत्यक्ष दबाव आणायचा प्रयत्न केला होता; मात्र भारताने कोणत्याही एकतर्फी धोरणांचा स्वीकार न करता परस्पर हितसंबंध आणि समतोल यांवर आधारित करार साकारला आहे. हा दृष्टीकोन भारताच्या दीर्घकालीन व्यापार स्थैर्यासाठी पोषक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ब्रिटनमधील दौयाच्या वेळी कट्टरतावाद्यांना लोकशाहीचा दुरुपयोग करू न देण्याची चेतावणी दिली आहे. आज ब्रिटन हा भारतातून पळून गेलेल्या अनेक गुन्हेगारांना स्वगार्सारखा वाटत आहे. भारतात अब्जावधी रुपयांची फसवणूक केल्यानंतर ललित मोदी, विजय मल्ल्या, नीरव मोदी आदींनी लंडनमध्ये आश्रय घेतला आहे. ब्रिटनमधील गुंतागुंतीच्या कायदेशीर प्रक्रियेमुळे गेल्या अनेक वर्षांपासून या सर्व आरोपींना भारतात परत आणण्याचे प्रयत्न यशस्वी झालेले नाहीत. नीरव मोदी सध्या लंडनच्या कारागृहात आहे, तर विजय मल्ल्या आणि ललित मोदी कारागृहातून सुटले आहेत. घोटाळेबाजांचे लवकरच प्रत्यार्पण करून भारतात आणले जाण्यासाठी निर्णायक प्रयत्न हवेत. एक-दीड वषार्पूर्वी ह्यइंडिया आऊटह्ण धोरण अवलंबलेल्या मालदीवला भारताशी मैत्रीपूर्ण संबंध निर्माण करून भारताचे स्वागत करावेच लागले, हे भारताच्या परराष्ट्र धोरणांचे यश ! धार्मिक दृष्टीने तुर्कियेचा मित्र आणि आर्थिकदृष्ट्या चीनच्या हातातले बाहुले बनून भारताला डिवचणार्याया मालदीवला सर्वच क्षेत्रांत भारताच्या आधाराची आवश्यकता पडलीच. त्यामुळे पंतप्रधान मोदी यांचे स्वागत करण्यासाठी मालदीवचे राष्ट्रपती मुईज्जू यांना पायघड्या घालत संपूर्ण मंत्रीमंडळासह उपस्थित रहावे लागले. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदी यांचा मालदीव दौरा महत्त्वपूर्ण आहे. हे चित्र मात्र मालदीवमधील भारतद्वेषींना अद्याप रुचलेले दिसत नाही. मालदीवचे राष्ट्रपती महंमद मुईज्जू यांचे मेहुणे आणि सलाफी जमियतचे नेते शेख अब्दुल्ला बिन महंमद इब्राहिम यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना 'आतंकवादी' म्हणत 'इस्लामचे शत्रू' संबोधले. शेख अब्दुल्ला यांच्यावर टीका झाल्यावर त्यांनी सामाजिक माध्यमांवरून 'पोस्ट' काढून टाकली. मुईज्जू यांनी या पूर्ण प्रकरणात गप्प रहाणेच पसंत केले. लहान; पण भारतासाठी सामरिकदृष्ट्या महत्त्वाचा म्हणून भारताने आतापर्यंत मालदीवशी चांगले संबंध टिकवण्याचा पुरेपूर प्रयत्न केला. भारताने मालदीवला ५० दशलक्ष डॉलर्सचे कर्ज विनामूल्य दिले असून 'ग्रेटर माले कनेक्टिव्हिटी' प्रकल्पासारख्या मोठ्या पायाभूत सुविधांसाठी ५०० दशलक्ष डॉलर्सचे अनुदान आणि कर्जही दिले. भारताच्या साहाय्याने 'हन्केडे' पूल, जलसंधारण प्रकल्प, स्थानिक रस्ते आणि फेरीसेवा यांचाही मालदीवमध्ये विकास होत आहे. या सर्व प्रकल्पांमुळे मालदीवचे भारतावरील आर्थिक आणि तांत्रिक अवलंबित्व अधिक बळकट झाले आहे. अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने अडचणीत असलेल्या मालदीवला भारताने दिलेले हे साहाय्य केवळ मदतीपुरते मर्यादित नाही, तर हे एक व्यापक धोरण आहे. चीनच्या वाढत्या प्रभावाच्या पार्श्वभूमीवर, भारताने मालदीवला नियंत्रणात ठेवण्यासाठी 'सॉफ्ट पावर'चा उपयोग केला आहे. भारताने या नात्याला केवळ आर्थिक लाभापेक्षा, धोरणात्मक सुरक्षिततेच्या अंगाने पाहिले आहे. हिंद महासागरात भारताची सागरी उपस्थिती भक्कम रहावी, यासाठी मालदीव एक निर्णायक भागीदार ठरतो. त्यामुळेच भारताकडून मालदीवला केले जाणारे आर्थिक साहाय्य ही चीनसारख्या देशांच्या वाढत्या हस्तक्षेपावर तोलामोलाची प्रतिक्रिया आहे. अनेक देशांशी व्यापारासंबंधी विविध करारांच्या माध्यमांतून भारताची अर्थव्यवस्था बळकट करण्याचा पंतप्रधान मोदी यांचा प्रयत्न राहिला आहे. राष्ट्रहितैषी परराष्ट्र धोरणांमुळे जागतिक स्तरावर भारताच्या हितसंबंधांची जोपासना होत आहे. ब्रिटन आणि मालदीव दौयातील घडामोडींमुळे भारत व्यापारी भूमिकेच्या माध्यमातून 'राष्ट्र प्रथम' या तत्त्व अवलंबत आहे. भारत-ब्रिटन मुक्त व्यापार करार हा देशाच्या उद्योगक्षेत्रातील संधी आहे, तर भारत-मालदीव संबंध हिंद महासागरातील भारताची संरक्षणक्षेत्र बळकटीची संधी आहे. या २ महत्त्वाच्या घटनांमधून स्पष्ट दिसते की, भारत अन्य देशांसमवेत व्यावसायिक करार करतांना केवळ आकड्यांवर नव्हे, तर दीर्घकालीन भागीदारी आणि संतुलन यांवर भर देत 'ट्रेडसेटर' बनला आहे. आर्थिक विकासासह पंतप्रधान मोदी यांनी घोटाळेबाज आणि भारत विरोधक यांना कायमची अद्दल घडवण्याचाही 'ट्रेड' 'सेट' करावा, ही अपेक्षा !

ट्रम्प यांच्या नाकावर टिच्चून भारत-ब्रिटनची हातमिळवणी

संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरू होताच विरोधकांनी केंद्र सरकारला ऑपरेशन सिंदूरवरून कोंडीत पकडायला सुरुवात केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत अशी मागणी विरोधकांनी लावून धरलेली असतानाच पंतप्रधान मोदी आधी ब्रिटन आणि आता मालदीवच्या दौयावर निघून गेले आहेत. आमच्या प्रश्नांची उत्तरे टाळण्यासाठी पंतप्रधान मोदींनी पळ काढल्याचे विरोधक म्हणत असले तरी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ब्रिटन दौयातून भारत-ब्रिटनमधील संबंधांत एका नवीन ऐतिहासिक अध्यायाला सुरुवात झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ब्रिटिश पंतप्रधान केयर स्टार्मर यांची भेट घेत चहापानाबरोबरच मुक्त व्यापार करार आणि दहशतवादावर चर्चा केली. भारताने याआधी युरोपियन मुक्त व्यापार संघटनेच्या स्विट्झर्लंड, नॉर्वे, आईसलँड आणि लिकटेंस्टाईन अशा ४ देशांसोबत २०२४ मध्ये व्यापार करार केला होता. २०१४ नंतरचा हा भारताचा चौथा मुक्त व्यापार करार होता. भारताचे श्रीलंका, मॉरिशस आणि मलेशियासोबतही मुक्त व्यापार करार आहेत. भारताचा दक्षिण कोरिया, जपान आणि संयुक्त अरब अमिरातीसोबत व्यापक आर्थिक भागीदारी करार आहे. भारत आणि ऑस्ट्रेलियामध्ये आर्थिक सहकार्य आणि व्यापार करार आहे. भारताचा १० देशांच्या आसियान गटासोबत देखील व्यापार करार आहे. भारत आणि सिंगापूरमध्ये व्यापक आर्थिक सहकार्य करार आहे. तर, भारत-थायलंड यांच्यात प्राधान्यक्रमीत व्यापार करार आहे. त्यातच ब्रिटनसोबत झालेला द्विपक्षीय मुक्त व्यापार करार प्रमुख विकसित अर्थव्यवस्थांसोबतच्या भारताच्या संबंधांमधील एक महत्त्वाचा टप्पा ठरतो. मागील ३ वर्षांपासून या व्यापार करारावर दोन्ही देशांतील तज्ज्ञांच्या वाटाघाटी सुरू होत्या. अखेर त्यावर शिक्कामोर्तब करण्यात आले. भारत ही जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आहे. मागच्या काही वर्षांमध्ये खासकरून आखाती देश-इस्त्रायल युद्ध, रशिया-युक्रेन युद्धामुळे जागतिक पुरवठा साखळी प्रभावित झालेली असताना भारतीय अर्थव्यवस्थेने जागतिक अर्थव्यवस्था सावरून धरण्याचे मोठे काम करून दाखवले आहे. इतर देशांच्या तुलनेत स्थिर वाढ नोंदवर्णाया भारतीय अर्थव्यवस्थेची शक्ती ही देशांतर्गत बाजारपेठेतील प्रचंड मागणी हीच आहे. भारताच्या पुढे फक्त जपान, जर्मनी, चीन आणि अमेरिका हे आर्थिक महासत्ता असलेले देश आहेत. ब्रिटनदेखील जगातील सहाव्या क्रमांकाची प्रगत अर्थव्यवस्था असलेला देश आहे. अशा स्थितीत भारत-ब्रिटन यांच्यातील द्विपक्षीय संबंधांना जागतिक आर्थिक महत्त्व आहे. युरोपियन महासंघातून बाहेर पडल्यापासून मागील काही वर्षांपासून इंग्लंडची अर्थव्यवस्था सावरण्याचा प्रयत्न करत आहे. या करारामुळे ब्रिटनच्या अर्थव्यवस्थेत दरवर्षी सुमारे ४.८ अब्ज पाऊंड, वेतनात २.२ पाऊंड आणि इतर क्षेत्रांमध्येही कोट्यवधी पाऊंडची भर पडणार आहे. परंतु, निर्यातीच्या क्षेत्रात भारताला मुक्त व्यापार कराराचा सर्वाधिक फायदा होईल. सध्याच्या घडीला भारत-ब्रिटनमधील व्यापार सुमारे ५६ अब्ज अमेरिकन डॉलर्सवर पोहोचला आहे. हा आकडा २०३० पर्यंत दुप्पट करण्याचे दोन्ही देशांचे लक्ष्य आहे. एका अहवालानुसार, दोन्ही देशांतील व्यापार वषार्ला ३४ अब्ज डॉलर्सनी वाढेल. या कराराच्या अंमलबजावणीनंतर, पुढील काही वर्षांत भारताची निर्यात १० ते १२ अब्ज डॉलर्सने वाढू शकते. याचा अर्थ सुमारे ८६ हजार कोटी ते १.१ लाख कोटी रुपयांचा अतिरिक्त व्यापार नफा भारताला होईल. यामुळे भारतीय उत्पादन आणि सेवा क्षेत्र देखील बळकट होईल. ब्रिटनच्या रुपात भारतीय उत्पादनांसाठी अभूतपूर्व अशी बाजारपेठ उपलब्ध होईल. विविध कंपन्यांनी युकेमधील सर्व सेवा क्षेत्रांमध्ये काम करण्यासाठी वास्तुविशारद, अभियंते, शेफ, योग प्रशिक्षक आणि संगीतकार यांसारखे प्रतिभावंत करारांवर नियुक्त केले आहेत. त्या सर्वांची व्हिसा प्रक्रिया सुलभ होऊन या प्रतिभावंतांना ब्रिटनमध्ये काम करणे आणखी सोपे होईल. अभियांत्रिकी वस्तू, वाहनांचे सुटे भाग आणि सेंद्रिय रसायने यासारख्या वेगाने वाढणार्याया क्षेत्रांसह कापड, सागरी उत्पादने, चामडे, पादत्राणे, क्रीडा वस्तू, खेळणी तसेच रत्ने आणि दागिने यासारख्या कामगार-केंद्रित उद्योगांसाठी नवीन संधींचे दरवाजे उघडतील. भारतीयांचा मोठा प्रभाव ब्रिटनमधील अर्थ आणि राजकीय व्यवस्थेवर आहे. मूळ भारतीय वंशाचे ब्रिटनचे माजी पंतप्रधान ऋषी सुनक हे त्याचे मोठे उदाहरण म्हणावे लागेल. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची २ एप्रिलची घोषणा जगासाठी एक नवीन संकट घेऊन आली होती. ट्रम्प यांनी १८० पेक्षा अधिक देशांवर अव्वाच्या सव्वा रेसिप्रोकल टेरिफ लावल्यानंतर अमेरिकेसह युरोपियन, आशियाई बाजारात मोठी पडझड पहायला मिळाली. जगभरातील शेअर बाजार गडबडून गेले होते. कुठल्याही देशाला ऊठसूठ धमकावणारे डोनाल्ड ट्रम्प पुढची ४ वर्षे आणखीन सत्तेत असल्याने अनेक देशांनी अमेरिकेसोबतच्या व्यापारावर विसंबून राहण्याऐवजी इतर पर्याय शोधणे पसंत केले आहे.

भारतीय शौर्य पुन्हा एकदा उजेडात आणुया, चला 'विजय दिवस ' साजरा करूया!

लेखक
श्री.मंगलप्रभात लोढा
कौशल्य, रोजगार व नाविन्यता मंत्री,
महाराष्ट्र राज्य

आपल्या दैदीप्यमान पराक्रमी इतिहासाच्या जोरावर प्रखर राष्ट्रभक्तीने जगभरात भारतीय संस्कृतीची अटल छाप सोडणाऱ्या माज्या भारतीय बांधवांना 'विजय दिवसाच्या' हार्दिक 'शुभेच्छा!आजच्याच २६ जुलै १९९९ या दिवशी तत्कालीन पंतप्रधान श्रद्धेय दिवंगत अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वात कारगिल मध्ये पाकिस्तानला युद्धात पराजित करून 'भारतीय शुर सैनिकांनी ऑपरेशन विजय' यशस्वी केले. तब्बल १८ हजार फूट उंचीवर भारतीय सैन्याने आपले शौर्य जगाला दाखवले होते. एवढ्या उंचीवर आणि उणे ४० अंश सेल्सिअस तापमानात लढले गेलेले हे युद्ध जगातील एकमेव उदाहरण म्हणावे लागेल. हा भारतीयांच्या शौर्याचा अगदी अलिकडचा पराक्रम आहे. पण गेल्या ३ तीन हजार वर्षात भारतीय वीर भूमिपुत्रांनी आणि योध्यानी असाच शौयार्चा इतिहास रचला,पण तो इतिहास आजच्या पिढी पर्यंत ज्या प्रखरतेने पोहोचायला पाहिजे त्या प्रखरतेने आतापर्यंत पोहोचला नाही, याची मला खंत आहे. ही उणीव भरून काढण्यासाठी आणि विजय दिवसाचे औचित्य साधत माज्या कौशल्य विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या राज्यातल्या सर्व शासकीय आणि खाजगी मिळून एक हजार व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण केंद्रात भारतीय विजयाची गाथा विद्यार्थ्यांपुढे मांडण्याचा उपक्रम आम्ही सुरू केला. ऐतिहासिक लढाया, पराक्रमी राजे, योध्ये यांचे पोस्टर प्रदर्शन, त्याअनुषंगाने काव्य, निबंध स्पर्धा, माजी सैनिकांचे वीरगाथे संदर्भात व्याख्यान, वीरमाता, वीर पत्नी यांचा सन्मान आणि शहिदांना नमन या कार्यक्रमांनी भारतीय पराक्रमाला विविध संस्थांमध्ये उजाळा देण्यात येणार आहे.

भारतीय भूमिपुत्र राजे,योध्ये यांचे शौर्य

भारतीय शूरवीर पराक्रमी राजांचे शौर्य विद्यार्थ्यांच्या मनात बिंबवून प्रखर राष्ट्रभक्तीची प्रेरणा नव्याने जागृत करावी या उद्देशाने लोणावळा येथील क्रांतिकारक लहुजी साळवे औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नांगरगाव येथे विजय दिवसाचे पाहिले पुष्प वाहण्यात आले. भारतीय महापराक्रमी राजांनी आणि भारतमातेच्या शुर रण रागिणीनींनी परकीय आक्रमण परतवून लावताना दाखवलेल्या शौयार्ची गाथा राज्यभरातल्या संस्थांमध्ये सांगितली जाणार आहे. भारतीय इतिहास साक्ष देतो की, भारतभूमीवर आलेल्या प्रत्येक परकीय आक्रमकास भारतीय धैयार्ने आणि पराक्रमाने सामोरे गेले. अलेक्झांडरशी लढणारा राजा पुरू, इस्लामी आक्रमकांविरुद्ध उभे ठाकलेले महाराजा सुहेलदेव, अकबराला धूळ चारणारी राणी दुर्गावती, महाराणा प्रताप ज्यांनी मेवाडच्या प्रत्येक कणाकणात स्वातंत्र्याची शपथ रुजवली, छत्रपती शिवाजी महाराज ज्यांनी हिंदवी स्वराज्याची ज्योत पेटवली, आणि पृथ्वीराज चौहान ज्यांनी शत्रूंना वेळोवेळी पराभवाची धूळ चारली. दुदैवाने, हा इतका गौरवशाली विजयाचा इतिहास काही काळ राजकीय स्वार्थाच्या धुसर पडद्याआड लपला. या पराक्रमाचे सखोल चित्रण भारतीयांच्या पुढे आले नाही हे आपले दुर्दैव. मात्र आता हे चित्र बदलण्याची वेळ आली आहे. नव्या पिढीला आपल्या राष्ट्राच्या शौर्यगाथांचा अभिमान बाळगता यावा, त्यांच्या नसानसांत भारतीयत्व आणि पराक्रमाची ज्योत पेटावी यासाठी विजय दिनाचा उत्सव साजरा करणे अत्यावश्यक आहे. पराक्रमी राजांनी भारताच्या दैदिप्यमान विजयगाथेत सोनेरी पाने भरली. हीच सोनेरी पाने पुन्हा एकदा ऊजेर्ने ओतप्रोत भरलेल्या तरुणांसमोर उलगडली जाणार आहेत.

स्वातंत्र्यानंतरही भारताची विजयाची परंपरा

ज्याप्रमाणे आपल्या भूमिपुत्र राजांनी परकीय आक्रमणाच्या विरोधात पराक्रमाची ज्योत तेवत ठेवली त्याचप्रमाणे स्वातंत्र्यानंतरही भारतीय सैन्याने शत्रू राष्ट्रांवर विजय मिळवला. पाकिस्तानविरुद्ध १९४८ मध्ये पहिले युद्ध, १९६५ चे युद्ध, १९७१ चे युद्ध ज्यामध्ये बांगलादेशाची मुक्तता झाली. या प्रत्येक लढ्यात भारतीय सैन्याने प्राणांची आहुती देत भारतीयांची छाती गौरवाने फुलवली. अलीकडील पाकिस्तान पुरस्कृत उरी हल्ल्यानंतर पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारतीय सैनिकांनी केलेला सर्जिकल स्ट्राईक, बालाकोट एअर स्ट्राईक आणि 'ऑपरेशन बंधन' सारख्या मोहिमांनी भारताची दहशतवादाविरुद्धची कठोर भूमिका जगाला दाखवून दिली. नुकतेच पहलगामच्या भ्याड हल्यानंतर 'ऑपरेशन सिंदुर' ने दिलेले जशाच तसे उत्तर हा नव्या भारताचा आक्रमक पवित्रा संपूर्ण जगाने पहिला.

भारतीय संस्कृतीत विजय ही केवळ ऐतिहासिक घटना नाही, ती आपल्या जीवनमूल्यांचा, परंपरांचा आणि राष्ट्राभिमानाचा गाभा आहे. विजय दिवस हा उत्सव शौर्य, बलिदान आणि स्वराज्याची प्रेरणा देणारी ऊर्जा आहे. चला प्रखर राष्ट्रभक्तीच्या भावनेने शौयार्ला मनोभावे वंदन करुया!

जय हिंद!वंदे मातरम!

मोदीयुग

हिंदू पुराणांत चार युगांची कल्पना सांगितली आहे. चार युगांच्या चक्राकार गतीने विश्व बांधलेलं आहे, असं त्यात म्हटलं आहे. ते कितपत खरं माहीत नाही, पण गेल्या अकरा वर्षांपासून भारतात 'मोदीयुग' सुरू आहे, याबाबत कोणाचंच दुमत असणार नाही. अगदी विरोधकांचंसुद्धा. कारण, २०१४ पासून आतापर्यंत तीन सार्वत्रिक निवडणुका झाल्या, राज्यांमध्ये विधानसभेच्या तेवढ्याच निवडणुका झाल्या, त्या प्रत्येक निवडणुकीत ह्यमोदी फॅक्टरह्णच निर्विवाद ठरला आहे. या ह्यफॅक्टरह्णच्या बळावरच भारतीय जनता पक्षाने जिथे तिथे आपली विजयरेखा कोरली आहे. राज्यातल्या विधानसभेच्या निवडणुकांत पक्षाला काही ठिकाणी कमी यश मिळालं. पण, त्या परिस्थितीतही नुकसान कमीत कमी करणारा ह्यमोदी फॅक्टरह्ण होताच. ते नसतं, तर कदाचित तिथे पक्षाला आणखी नुकसान सोसावं लागलं असतं. भारतीय जनता पक्षाच्या विजयाचा वारू गेल्या दहा-बारा वर्षांत चौखुर उधळला आहे, हे खरंच आहे. पण, त्याचं कारण त्या वारूचा लगाम मोदींच्या हातात आहे, हे त्याहून खरं आहे. मोदींचा करिष्माच अजब आहे. साधे आमदारही नसताना ते थेट गुजरातचे मुख्यमंत्री झाले आणि पंतप्रधान पदाचा उमेदवार म्हणून जनतेने स्वीकारल्यानंतर खासदार झाले! त्यांच्या मार्गात कमी अडथळे आले नाहीत. चहुबाजूने वाटेत काटे पेरण्याचे प्रयत्न झाले. पण, साहस आणि अचल वृत्तीने त्यांनी आपली मार्गक्रमणा सुरूच ठेवली. हे शतकच जणू मोदींसाठी उजाडलं आहे. शतकाच्या प्रारंभी, २००१ मध्ये ते गुजरातचे मुख्यमंत्री झाले. १४ वर्षे सलग मुख्यमंत्रीपद भूषवल्यानंतर, 'गुजरात मॉडेल'च्या यशस्वी प्रयोगानंतर त्यांची पंतप्रधान म्हणून कारकीर्द सुरू झाली. वयाच्या पन्नाशीनंतर सरकारमध्ये आलेल्या मोदींनी 'गुजरातचे मुख्यमंत्री ते विश्वगुरू' ही गेल्या २५ वर्षांत केलेली वाटचाल जगातील भल्याभल्यांना कोड्यात टाकते आहे. हे 'मोदीयुग' यापुढेही अखंड राहावे, हीच भारतातल्या सर्वसामान्य माणसाची इच्छा आहे.

काल, २५ जुलै २०२५ रोजी मोदींनी आपले पंतप्रधान पदावरील सलग ४ हजार ७८ दिवस पूर्ण केले. १९६६ ते १९७७ दरम्यानचा माजी पंतप्रधान, दिवंगत इंदिरा गांधी यांचा सलग कार्यकाळ चार हजार ७७ दिवसांचा होता. म्हणजे, मोदी आता पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यानंतर भारताचे सर्वाधिक काळ सलग राहिलेले पंतप्रधान ठरले आहेत! मोदींसह आतापर्यंत १५ जणांनी भारताचं पंतप्रधानपद भूषवलं आहे. त्यात अखंड कारकिर्दीने या १५ जणांमध्ये दुसऱ्या क्रमांकावर झेप घेणं ही सोपी गोष्ट नाही. स्वातंत्र्यानंतर देशाच्या कारभाराची सूत्रं दीर्घकाळ काँग्रेसकडे राहिली. आणीबाणीनंतरच्या निवडणुकीने जनता पक्षाच्या रूपाने देशाला पहिलं बिगर काँग्रेसी सरकार दिलं. पण, मतदारांनी दिलेला पाच वर्षांचा कार्यकाळही ते पूर्ण करू शकलं नाही. पूर्वाश्रमीचा जनसंघ जनता पक्षाच्या त्या प्रयोगात होता. समाजवादी नेते मधु लिमये यांनी दुहेरी सदस्यत्वाचा मुद्दा उपस्थित केल्यानंतर जनता पक्षातील पूर्वाश्रमीच्या जनसंघाच्या आणि समाजवादी पक्षाच्या नेत्यांमधील जरी इतकी रुंदावली, की त्यातून सरकार तर कोसळलंच; पण जनता पक्षही संपला. पूर्वाश्रमीच्या जनसंघियांनी ह्यभारतीय जनता पक्षह्ण नांवाने आपली स्वतंत्र वाटचाल सुरू केली. अवघ्या दोन खासदारांपासून पक्षाच्या त्या काळातील धुरिणांनी हिम्मत न हरता आपली मार्गक्रमणा सुरू ठेवली. १९९६ आणि १९९८ अशी दोनदा देशात सरकार स्थापन करण्याची संधी त्या पक्षाला मिळाली. अटलबिहारी वाजपेयी यांनी दोन्ही वेळा सरकारचं नेतृत्व केलं. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुशीतून घडलेल्या, देशात सर्वमान्य असलेल्या वाजपेयींनी आपली आणि आपल्या सरकारची स्वतंत्र प्रतिमा जपली. पण, मोदींच्या तुलनेत वाजपेयी मुळातच सौम्य प्रकृतीचे नेते होते. १४ वर्षांचा प्रशासनाचा जो दीर्घ अनुभव मोदींकडे होता, तो वाजपेयींकडे नव्हता. मोदी यांनी पंतप्रधान होताच संपूर्ण राजकीय, प्रशासकीय घडी बदलली. धडाकेबाज निर्णय घेतले. काँग्रेसची छाप पुसून टाकण्याचा व्यापक कार्यक्रम हाती घेतला. अन्य विरोधी पक्षांनाही हतबल करून टाकलं. त्यामुळे, संपूर्ण देशात भाजप आणि मोदींचाच एकछत्री अंमल असल्याचं चित्र निर्माण झालं. जगभर मोदींचे चाहते तयार झाले. आपल्या चाहत्यांत केवळ सर्वसामान्यच नाहीत, सर्वशक्तिमान देशांचे राष्ट्रप्रमुखही आहेत, हे मोदींनी जगाला दाखवून दिलं.

खंडित काळ गृहीत धरला, तर इंदिरा गांधी यांची एकूण कारकीर्द मोदींपेक्षा जास्त आहे. नेहरूंची त्यापेक्षाही मोठी आहे. पण, स्वातंत्र्यानंतर जन्मलेले मोदी हे देशाचे पहिले पंतप्रधान आहेत. कोणत्याही बिगर काँग्रेसी पंतप्रधानांपेक्षा मोदींची कारकीर्द मोठी आहे. उत्तरेतल्या हिंदी भाषिक पट्ट्याबाहेरचे; गुजरातचे ते दीर्घकाळ राहिलेले आता एकमेव पंतप्रधान आहेत. ज्यांनी मुख्यमंत्रीपद आणि पंतप्रधानपद अशी दोन्ही पदं भूषवली, असेही ते सर्वाधिक काळ पंतप्रधानपदी असलेले नेते ठरले आहेत. लोकसभेचे दोन कार्यकाल पूर्ण केलेले तर ते एकमेव काँग्रेसेतर पंतप्रधान आहेत. लोकसभेची निवडणूक दोनदा सलग निवडून जिंकलेलेही ते पहिले बिगरकाँग्रेसी पंतप्रधान आहेत. लोकसभेच्या सलग तीन निवडणुका जिंकलेले, पंडित नेहरूंनंतर केवळ मोदी हेच पंतप्रधान आहेत. २०२२ पासून सलग सहा निवडणुका ते अजिंक्य आहेत. त्यातल्या तीन विधानसभेच्या, तर तीन लोकसभेच्या निवडणुका आहेत. नव्या रचनेत आंतरराष्ट्रीय पातळीवरची प्रत्येक घडामोड राष्ट्रीय राजकारणावर, अर्थकारणावर आणि स्थैर्यावर परिणाम करत असते. त्या अथार्ने बदलत्या आंतरराष्ट्रीय समीकरणांमध्ये देशाची प्रगतीची घोडदौड कायम राखणं ही सोपी गोष्ट नाही. आंतरराष्ट्रीय दबावांना न जुमानता देशहिताचं आर्थिक, औद्योगिक, व्यापारी धोरण आखणं आणि त्यातून देशहित साधणं ही तर त्यापेक्षाही अवघड कसोटी आहे. सीमेवरील शेजारी सर्व देशांत उद्रेक आणि असंतोष असूनही देशांतर्गत शांतता कायम राखण्यासाठी उच्च प्रतीच्या प्रशासकीय कौशल्याची गरज आहे. हे कौशल्य, जनतेवरचा वादातीत प्रभाव, राजकारणावरची मजबूत पकड, सर्व यंत्रणावरचं विलक्षण नियंत्रण आणि त्याचवेळी आंतरराष्ट्रीय व्यासपीठावरचा वावर - मोदींनी स्वतःला पूर्ण सिद्ध केलं आहे. आकड्यांची ही शर्यत त्यामानाने खूप छोटी गोष्ट वाटली, तरी त्या आकडेवारीतून दिसणारं सातत्य हे कोणत्याही लोकशाही देशातील नेत्यासाठी सर्वात मोठं प्रशस्तिपत्र आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या कारकिदीर्चा हा तर केवळ एक टप्पा आहे !

विसर्जनाची अडचण

यंदाचा गणेशोत्सव आता जेमतेम महिन्यावर आलेला असताना मूर्ती विसर्जनाबाबत निर्माण झालेला पेच मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे संपुष्टात आला आहे. गणेशोत्सवाची वाढत चाललेली लोकप्रियता, जल्लोषात उत्सव साजरा करण्याची भक्तांची मानसिकता आणि त्यातूनच मूर्तींच्या उंचीबाबत निर्माण झालेली चढाओढ यातूनच गणेशोत्सव, नवरात्रोत्सव तसेच माघी गणेशोत्सवातील मूर्ती विसर्जनाबाबत समस्या निर्माण झाली होती. गणेश मूर्तींची वाढती उंची हा भाविकांच्या उत्साहाचा विषय असला तरी विसर्जन मिरवणुकीसाठी उंच मूर्ती मंडपातून काढणे, विसर्जनस्थळी वाजतगाजत नेणे, रस्त्यादरम्यान होणारी वाहतूक कोंडी, भाविकांचे नृत्य, गणेश भक्तिपर गाण्यांचा जल्लोष यामध्ये मंडपातून निघालेली मूर्ती वाहनातून विसर्जनस्थळी नेईपर्यंत मूर्ती सांभाळणाऱ्या कार्यकर्त्यांना करावी लागणारी तारेवरची कसरत हे एकप्रकारचे अग्निदिव्यच असते. दरवर्षी उंच मूर्ती विसर्जित करताना महापालिका कर्मचारी, सुरक्षा रक्षक, मंडळाचे पदाधिकारी, सदस्यांना द्राविडी प्राणायम करावा लागतो.प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींच्या उंचीवरून वादास सुरुवात झाली आहे. पीओपीच्या मूर्तींना बंदी घालण्यात आली असली तरी विविध कारणांमुळे बंदीच्या अंमलबजावणीला अजून यश आलेले नाही. पीओपींच्या मूर्तींचा वाद हा अलीकडच्या गेल्या काही वर्षांमध्ये निर्माण झालेला आहे. मुंबई उच्च न्यायालयाने ३० जानेवारी २०२५ पीओपीपासून बनवलेल्या मूर्ती आणि त्यांचे जलसाठ्यात विसर्जन करण्याविरुद्ध अंतरिम आदेश दिला आणि केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (सीपीसीबी) मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आदेश दिले. तथापि, न्यायालयाने आदेश देऊनही बाजारात पीओपीच्या मूर्ती आजही निर्माण होत आहेत. पीओपींच्या मूर्तींमुळे जलप्रदूषण होत असल्याने केंद्र सरकारने त्या मूर्तींच्या विसजर्नास वारंवार आक्षेप घेत शाडूच्या मूर्ती अथवा अन्य पर्यांयाचा शोध घेण्यास यापूर्वीच सुचविले आहे. पीओपी पर्यावरणपूरक नाही. ते नद्यांमध्ये, पाण्यात विरघळू शकत नाही. त्यामुळे नद्या उथळ होतात. दुसरीकडे तलाव किंवा विहिरीत विसर्जन केले, तर नैसर्गिक पाण्याचे स्त्रोत खराब होतात. त्यामुळे या मूर्तींना नाही तर त्यांच्या विसर्जनाला व त्यातून निर्माण होणा

पुलाव

साहित्य : २ वाटी तांदूळ, २ वाटी पुदिन्याचे पाने निवडून व धुऊन, फोडणीसाठी तमालपत्र, जिरे, पाच ते सहा लसूण पाकळ्या, अंदाजे मीठ, लाल मिरची फोडणीसाठी.

कृती : पुदिना व लसूण पेस्ट बनवून घ्या.

तांदळाचा मोकळा भात शिजवून थंड होऊ द्या. पुलाव मसाला लहान १ चमचा, गरम पॅनमध्ये तेल, जिरे, तमालपत्र व मिरची घालून फोडणी द्या. त्यावर वाटलेला पुदिना घाला व परत पुलाव मसाला घाला. चांगले परतून शिजवलेला भात घाला. मीठ घाला, परतून वाफ येऊ द्या. खोबऱ्याचा किस व पुदिना पाने लावून सजवा व खायला वाढा. यामध्ये मिक्स पालक थोडी वाफवून व वाटून आपण घालू शकता.

शाम्पूच्या वापरामुळे केसगळतीची समस्या वाढते का?

कधीकधी अचानक केस खूप गळत असल्याचे तुमच्या लक्षात येते.केस गळण्याचे कारण शोधताना मनात अनेक प्रश्न निर्माण होतात. सर्वसाधारणपणे आपण रोज केस स्वच्छ धुण्यासाठी शाम्पूचा वापर करतो. त्यामुळे आपण वापरत असलेल्या शाम्पूमुळे तर केस गळत नाहीत ना? किंवा कोणता शाम्पू आपल्या केसांसाठी योग्य असू शकतो? हे प्रश्न आपल्याला पडू शकतात.

केस गळणे ही अनेकांना भेडसावणारी एक गंभीर समस्या आहे. मात्र केस गळण्याची कारणे प्रत्येक व्यक्तीमध्ये निरनिराळी असू शकतात. डॉ. अपूर्वा शाह यांनी त्यांच्या 'हॅव अ ग्रेट हेअर डे' या पुस्तकामध्ये शाम्पू केल्यामुळे केस गळत नाहीत किंवा तेलांमुळे केसांच्या त्वचेतील मुळे बंद होत नाहीत, असे मत मांडले आहे. त्याचप्रमाणे हेअर एक्सपर्ट जावेद हबीब यांनी देखील त्यांच्या 'हेअर योगा' या पुस्तकामध्ये शाम्पूच्या वापरामुळे केस गळत नाहीत, या सत्याचा उलगडा केला आहे.

अयोग्य शाम्पू वापरल्यामुळे मात्र तुमच्या केसांची मुळे नक्कीच कमजोर होऊ शकतात. त्यामुळे बरेच दिवस तुमचे केस गळत राहतात व केसांचे खूप नुकसान होते. यासाठी तुमच्या केसांच्या प्रकारानुसार योग्य शाम्पूचा वापर करणे गरजेचे आहे.

योग्य शाम्पू कसा निवडाल?

तुमच्या केसांचा प्रकार ओळखून योग्य शाम्पूची निवड करा. बाजारात अनेक ब्रॅण्डचे शाम्पू उपलब्ध असले तरी त्यातून तुमच्यासाठी योग्य प्रकारच्याच शाम्पूची निवड करा. त्याचप्रमाणे दर ४ ते ५ आठवड्यांनी तुमच्या शाम्पूचा ब्रॅण्ड बदला. सतत एकाच ब्रॅण्डचा शाम्पू वापरल्यामुळे तुमच्या केसांमधील त्वचेवर त्याचा दुष्परिणाम होतो व तुम्हाला हवा तसा योग्य बदल दिसून येत नाहीत.

योग्य शाम्पूची निवड करण्यासाठी आधी तुमच्या केसांचा प्रकार ओळखा –

- **ऑईली हेअर –** काही दिवस केसांमधील त्वचा तेलकट असते, पण केसांची शेवटची टोके कोरडी असतात.
- **ड्राय हेअर –** केस खरखरीत असतात, जे लवकर गुंततात व कुरळे किंवा फ्रिजी असतात.
- **नॉर्मल हेअर –** केसांचा पोत अति कोरडा अथवा अति तेलकटही नसतो.
- **डॅमेज हेअर –** या केसांमध्ये कोंडा किंवा केस दुभंगण्याची (स्प्लीट एण्ड) समस्या असते.
- **लीम्प हेअर –** केस सपाट असतात, ज्यांचा व्हॉल्युम जास्त नसतो किंवा केस फुललेले नसतात.

ॲल्युमिनियम फॉईलमध्ये पदार्थ का शिजवू नयेत?

जर तुम्ही दररोज जेवणासाठी ॲल्युमिनियम फॉईलचा वापर करत असाल तर ही बातमी तुमच्यासाठी महत्त्वाची आहे.

नुकत्याच करण्यात आलेल्या संशोधनातून असे समोर आले आहे की ॲल्युमिनियम फॉईलमध्ये शिजवलेले अथवा गुंडाळलेले पदार्थ खाल्ल्याने शरीरावर परिणाम होतो.

जेव्हा ॲल्युमिनियम फॉईलमध्ये अन्न शिजवले जाते, त्यावेळी मोठ्या प्रमाणात ॲल्युमिनियम अन्नात मिसळते आणि हे अन्न खाल्ल्याने ते शरीरात जाते. यामुळे हाडांचे आजार तसेच ब्रेन सेल्सची वाढ कमी होण्याची शक्यता असते.

आवळा सरबत प्या, हे १० आजार टाळा

आपले आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी आवळा उत्तम आहे. आवळा सरबत घेतल्याने आपल्याला अनेक फायदे होतात. आपले आरोग्य चांगले राहते. आयुष्य वाढण्यास मदत होते. आयुर्वेदातही आवळ्याला अधिक महत्त्व देण्यात आले आहे. आवळा सरबतात मध मिसळले तर अधिक चांगले. तसेच आवळा ज्यूसमुळे महिलांच्या पाळीची समस्या दूर होण्यास मदत होते.

- आवळा ज्यूस आणि मध एकत्र करून प्यायल्याने दम्याचा प्रभाव कमी होतो.
- रक्त शुद्ध करण्यासाठी आवळा सरबत आणि मध खूप गुणकारी आहे.
- आवळा सरबत नियमित घेतल्यास कोलेस्ट्रॉल कमी होते. त्यामुळे हृदयरोगाचा धोका टळण्यास मदत होते.
- आवळा खाण्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते. कारण मेटाबॉलिजम व्यवस्थित होऊन वजन कमी होते.
- आवळा हा पाचक आहे. त्यामुळे पचन व्यवस्था व्यवस्थित राहते.
- आवळा सरबत प्यायल्याने चेहऱ्याला ग्लो येतो. तसेच त्वचारोग दूर होण्यास मदत होते.
- लघवीचा ज्यांना त्रास आहे, त्यांच्यासाठी आवळा सरबत चांगले. सरबत प्यायल्याने लघवीसंबंधीचे आजार दूर होतात.
- ज्यांना किडनी स्टोनचा आजार आहे, त्यांच्यासाठी आवळा सरबत चांगले. मूतखड्याचा आजार दूर होण्यास मदत होते.
- आवळ्यामुळे मधुमेह (Disbetes) नियंत्रणात राहण्यास मदत होते.
- सतत तोंड येत असेल तर आवळा सरबत प्यायल्याने ही समस्या दूर होते. तसेच डोळ्यांची शक्ती वाढण्यास मदत होते.

अंडे तुमचे रक्षण करेल मधुमेह होण्यापासून

आजच्या घडीला कमी वयातच कित्येक लोकांना मधुमेह म्हणजे डायबेटिसचा त्रास होऊ लागला आहे. पण तुम्हाला जर अंडे खायला आवडत असेल तर तुमच्यासाठी एक आनंदाची बातमी आहे. तसे तर अंडे नेहमी खाल्ल्याने अनेक फायदे होतात. पण 'अमेरिकन जर्नल ऑफ क्लिनिकल न्यूट्रिशन'मध्ये नुकत्याच प्रकाशित झालेल्या एका अभ्यासात असे समोर आले आहे की, एका आठवड्यात चार अंडी पुरुषांनी खाल्ली तर त्यांना टाइप-२ मधुमेह होण्याची शक्यता आठवड्यातून एकच अंड खाणाऱ्या पुरुषापेक्षा ३७ टक्क्यांनी कमी होते. जगभरात टाइप-२ मधुमेह चांगला वेगाने पसरत असून वर्ष १९८४ ते १९८९ च्या मधील ४२ ते ६० वयोगटातील २,३३२ वयोवृद्ध लोकांच्या खाण्या-पिण्याच्य सवयींचे पूर्व फिनलंड विश्वविद्यालयातील संशोधकांनी मूल्यांकन केले. त्यानंतर १९ वर्षे त्यांचा फॉलोअप घेतल्यानंतर ४३२ लोकांना टाइप-२ मधुमेह झाल्याचे आढळले. अभ्यासातून समोर आले की, अंड्याचे सेवन केल्याने टाइप-२ मधुमेह होण्याची शक्यता आणि रक्तात ग्लुकोज स्तर कमी झाला.

किचनमधील हे पदार्थ केवळ स्वाद नाही तर त्वचेची चमकदेखील वाढवतात

हरभरा पीठ आणि हळदीचा फेस पॅक

साहित्य :

- अर्धा किंवा एक चमचा हळद
- चार चमचे हरभरा पीठ
- दूध किंवा पाणी

वापरण्याची पद्धत :

- हरभरा पीठ आणि हळदीची पेस्ट बनवण्यासाठी पाणी किंवा दुधाचा वापर करा.
- ही पेस्ट चेहरा, मानेवर लावा आणि वाळू द्या. नंतर पाण्याने धुऊन घ्या.
- ही पेस्ट आठवड्यातून १ किंवा २ वेळा वापरली जाऊ शकते.

हे कसे कार्य करते?

हळदीत करक्युमिन नावाचे अँटीऑक्सिडेंट आढळतात आणि त्यात अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म असतात. हे त्वचेतील हानीकारक पदार्थ काढून आणि कोलेजनचे उत्पादन वाढवून त्वचेस तेजाळ करते.

टोमॅटो आणि चंदन पावडरचा फेस पॅक

पॅकसाहित्य :

अर्धा टोमॅटो, एक चमचा चंदन पावडर, चिमूटभर हळद

वापरण्याची पद्धत

- टोमॅटोमधील बिया काढाव्या.
- बिया नसलेल्या टोमॅटोत चंदनाची पावडर आणि हळद मिसळून त्याची पेस्ट करावी.
- ही पेस्ट चेहऱ्यावर लावून पंधरा मिनिटे तशीच राहू द्यावी. नंतर चेहरा पाण्याने स्वच्छ धुवावा.
- आठवड्यातून १ किंवा २ वेळा हा उपाय करता येऊ शकतो.

हे कसे कार्य करते?

टोमॅटोमध्ये व्हिटॅमिन सी जास्त प्रमाणात असते, त्यामुळे चेहरा सतेज होतो.

साखरेमुळे होणारे नुकसान

साखर मानव जीवनातील अविभाज्य अंग आहे आणि तिचा गोडवा जितका हवा हवासा वाटतो तेवढेच ते नुकसानदायकही आहे. जर आपल्यालाही साखर खाण्याची सवय असेल तर यापासून होणारे पाच नुकसान जाणून घ्या :

मधुमेह : आपल्या परिवारात कोणालाही डायबेटिस असल्यास आपण साखर कमी करावी. कारण अनुवांशिक रूपात याचे सेवन मधुमेहाचे कारण बनू शकतं.

खाज : साखरेची अतिरिक्त मात्रा सेवन केल्याने गुप्तांगामध्ये खाज सुटण्याची तक्रार होते. याने गुप्तांगाहून अत्यधिक तरल स्राव आणि संक्रमण होण्याची शक्यताही असते.

हृदयरोग : अधिक साखरेमुळे हृदयनलिकेत चरबी जमा होऊन ती ब्लॉक होण्याची शक्यता असते. याने हार्ट अॅटॅकची शक्यता वाढते.

इसब : त्वचेवर अधिक साखर सेवन केल्याचे वाईट परिणाम भोगावे लागतात. एका संशोधनाप्रमाणे साखरेमुळे इसब होण्याची शक्यता वाढते.

कमजोर हाडे : साखरेमुळे हाडे कमजोर होतात आणि ऑस्टिओपोरोसिस रोग होण्याची शक्यता असते.

वजन कमी करायचे आहे? मग काकडीचे सेवन करा!

काकडीत खूप कमी प्रमाणात कॅलरी असतात. १०० ग्रॅम काकडीमध्ये ५४ कॅलरी ऊर्जा असते. म्हणूनच काकडी खाल्ल्यानं वजन वाढत नाही. काकडी ब्लड प्रेशर कमी करते, मात्र ब्लड प्रेशरचा त्रास असणाऱ्या रुग्णांनी काकडीला मीठ लावून खाऊ नये. काकडी शरीरातील विषारी पदार्थ युरिनच्या माध्यमातून

- सोबतच काकडीच्या ज्यूसमध्ये अशी काही पोषक तत्त्वे आहेत की ज्यामुळं बद्धकोष्ठता आणि ॲसिडिटीची समस्या दूर होऊ शकते.
- पचनक्रिया मजबूत करण्यासोबत काकडी गॅस्ट्रिक आणि छोट्या आतडीचा अल्सर झालेल्या रुग्णांसाठी औषध म्हणून काम करते.
- काकडीमध्ये ९६ टक्के पाणी असतं, जे की कोणत्याही कंपनीच्या बंद बाटलीच्या पाण्यापेक्षा चांगलं आणि शुद्ध असतं.
- काकडीमध्ये अल्कलिन फॉर्मिंग (क्षार) म्हणूनच त्याचा प्रॉडक्ट्समध्येही मिनरल्स असतात, वापर ब्युटी प्रयोग केला जातो. यात अँटीऑक्सिडंटचं काम करणारे व्हिटॅमिन ए, सी, मँगनिज, पोटॅशियम, सिलिका आणि सल्फर असते.
- ताप आल्यास काकडीचा ज्यूस प्यावा. त्यामुळे शरीराचं तापमान नियंत्रणात राहतं.
- जर अपचनाचा त्रास होत असेल तर जेवणासोबत सॅलड म्हणून काकडी खावी.
- काकडी गोल कापून डोळ्यावर ठेवल्यास डोळ्यांची जळजळ कमी होते. दररोज सॅलड म्हणून काळं मीठ, काळीमिरी आणि लिंबू पिळून काकडी खावी. काकडीची कोशिंबिरही बनवून आपण खाऊ शकता.

ॲसिडिटीचा त्रास टाळता येईल का?

कामाच्या आणि जेवणाच्याही अनियमित वेळा, धावपळीचे दैनंदिन आयुष्य, बदलती जीवनशैली, जेवणाच्या अनियमित वेळा, जागरण, बदललेले आहाराचे स्वरूप यामुळे अपचन किंवा ॲसिडिटीचा त्रास होणे हा अनेकांच्या दिनक्रमाचाच भाग बनला आहे. आम्लपित्त किंवा हायपर ॲसिडिटी होऊन छातीत जळजळणं हा सध्याच्या धावपळीच्या जीवनात जवळजवळ प्रत्येकाला छळणारा विकार असतो. अनेकदा रुग्ण 'ॲसिडिटी होतेय' हीच तक्रार घेऊन डॉक्टरकडे येतात. पण या तक्रारीत खास ॲसिडिटीचा त्रास आहे की दुसरे काही आहे हे डॉक्टरला शोधून काढावे लागते. आपल्या आजूबाजूच्या अनेकांना हा त्रास होत असतो. छातीतील जळजळ प्रत्येकाने कधी ना कधी तरी अनुभवलेली असतेच असते, तर काही व्यक्तींची ती कायम सोबती असते. आपल्या आजूबाजूला कुटुंबात, शेजारीपाजारी अनेक जण यामुळे त्रस्त असतात. कुणाला जळजळतं, तर कुणाला मळमळतं, कुणाचे यामुळे डोके दुखते तर कुणाचे पोट दुखत असते. कधी खूप ढेकर येतात किंवा तोंडामध्ये कडवटपणा येतो. जळजळ होण्याची अनेक कारणे आहेत. त्यातील प्रमुख कारण म्हणजे ॲसिडिटी किंवा आम्लपित्त. त्यामुळे ॲसिडिटी म्हणजे काय, हा त्रास कुणाला व का होतो, त्यावर इलाज काय, हा त्रास टाळता येईल का, याबद्दल आपण जाणून घेऊ.

ॲसिडिटी म्हणजे नेमके काय?

आपल्या पोटात म्हणजे जठरात एक पाचक रस तयार होत असतो. तो ॲसिडिक म्हणजे आम्लयुक्त असतो. आपण जेवलेल्या अन्नाच्या पचनासाठी या पाचक रसाची अत्यंत गरज असते, पण योग्य प्रमाणात. हाच पाचक रस जर जास्त प्रमाणात निर्माण झाला किंवा अवेळी (म्हणजे जेवणाच्या वेळेव्यतिरिक्त) तयार झाला तर आम्लपित्ताचा त्रास होतो. यालाच ॲसिडिटी असे म्हणतात.

मधुमेहींसाठी उपयुक्त पामर किंवा जांभूळ आंबा

उन्हाळ्याचे दिवस हे रसदार, रसाळ आंब्याचे दिवस तर पावसाळ्यात जांभळे खाण्याची मजा काही औरच. ही दोन्ही फळे ज्यांना मनापासून आवडतात त्यांना या दोन्ही फळांची चव एकाच फळात मिळाली तर? होय या दोन्ही फळांची चव एकत्र चाखण्याची संधी आता भारतीयांना साधता येणार आहे. अमेरिकेच्या फ्लोरिडा राज्यात विकसित झालेला जांभूळ आंबा, मूळ नाव पामर मँगो, आता उत्तर प्रदेशात काही ठिकाणी लावला गेला आहे. हा आंबा मधुमेहींसाठी खूपच उपयुक्त असल्याच्या बातम्या व्हायरल झाल्या आहेत.

या जातीचे सगळ्यात पहिले रोप १९२५ साली मियामी येथे लावले गेले होते. २००१ पासून या इंटरनेटवर या विशेष आंब्याची चर्चा होते आहे. ब्राझीलमध्ये या जातीच्या आंब्याचे मोठे उत्पादन घेतले जाते. आता भारतात या जातीच्या आंब्याची लागवड केली जात असल्याचे समजते. सोशल मीडियावर त्यासंदर्भात बातम्या येत आहेत.

या आंब्याचा रंग फिकट जांभळा असून जांभूळ आणि आंबा या दोन झाडांच्या संयोगातून ही जात विकसित गेली आहे असे सांगितले जात आहे. या आंब्याची चव आंबा आणि जांभूळ यांचे मिश्रण आहे.

या आंब्यात अँटीऑक्सिडंट आहेत. याच्या सेवनाने पचन सुधारते, रक्त शुद्ध होते त्यामुळे त्वचा रोग दूर होतात, रक्तशर्करेचे प्रमाण कमी होते, वजन नियंत्रणात येते असे सांगितले जाते. या आंब्याच्या जातीचे एक नाव टोमी एटकिन असे असून यातही दोन वेगळ्या जाती आहेत. अर्थात या आंब्याच्या सेवनाचे जे फायदे सांगितले जात आहेत त्याची पुष्टी केली गेलेली नाही.

अंघोळ केल्यानंतर मिळणारा फ्रेशनेस कशातच नाही. दिवसातून किमान एकदा तरी आपण अंघोळ करतो. अंघोळ केल्यानंतर अंग पुसण्यासाठी आपण टॉवेलचा उपयोग करतो. तुम्ही वापरत असलेला टॉवेल तुमचे शरीर पुसण्याचे काम करतो, पण याशिवाय तुमच्या शरीरावरील मळ काढण्यासही मदत करतो. पण जर तुम्ही तुमच्या टॉवेलची योग्य काळजी घेतली नाही तर मात्र हाच टॉवेल तुमच्या त्वचेचा शत्रू बनू शकतो. आज आम्ही तुम्हाला याबद्दल अधिक माहिती देणार आहोत. त्यामुळे तुम्हीही टॉवेल कसाही वापरत असाल तर हे नक्की वाचा.

...तर तुमचा टॉवेल बनू शकतो तुमच्या त्वचेचा शत्रू

टॉवेलची स्वच्छता

काही जणांना टॉवेल सतत धुण्याची गरज नसते, असे वाटते. तुम्ही असा विचार करत असाल तर तो अगदीच चुकीचा आहे. कारण तुम्ही अंघोळ केल्यानंतर तुमच्या शरीरावर साचलेला मळ काढला जातो. त्यामुळे साहजिकच तुमचा मळ टॉवेलवर साचतो. अशावेळी जर तुम्ही हा टॉवेल सतत वापरत राहिलात तर तुमच्या त्वचेवरही मळ साचत राहील. त्यामुळे तुम्हाला स्वच्छ करणाऱ्या टॉवेलची स्वच्छताही तितकीच महत्त्वाची आहे. आठवड्यातून किमान दोन वेळा तरी तुमचा टॉवेल धुणे अपेक्षित असते. जर तुमचा टॉवेल पातळ असेल तर तुम्ही तो रोज धुतला तर फारच उत्तम.

आता आली फेकून देण्याची वेळ

टॉवेल कितीही चांगला वाटत असला तरी त्याला वापरण्याचीही काहीतरी मर्यादा आहे. तुम्ही वर्षानुवर्षे एकच टॉवेल वापरू शकत नाही. तुम्हाला कालांतराने टॉवेल फेकण्याचीही गरज असते. तुम्ही कॉटन किंवा टर्किश कोणताही टॉवेल वापरत असाल तरीदेखील तुम्ही हा टॉवेल सहा महिन्यांनी काढून टाकायला हवा. जास्तीत जास्त सहा महिने आणि कमीत कमी ३ महिने तुम्ही टॉवेल वापरायला हवा.

टर्किश की कॉटन टॉवेल

तुमची त्वचा ही फारच नाजूक असते. कोणतेही कॉस्मेटिक वापरताना तुम्ही अगदी पारखून सगळ्या गोष्टी तपासता. पण मग टॉवेलबाबतीत का नाही? तुम्हाला लवकर वाळणारा टॉवेल हवा असेल तर तुम्ही पंचा किंवा पातळ टॉवेलची निवड करा. जर तुम्हाला मऊ असा टॉवेल हवा असेल तर तुम्ही टर्किश टॉवेलचा वापर करा. आता तुमच्या आवडीवर टॉवेलची निवड अवलंबून आहे.

सूर्यप्रकाश महत्त्वाचा

अनेकांना टॉवेल वाळत घालण्याचा कंटाळा असतो. पण तुमच्या टॉवेलसाठी सूर्यप्रकाश महत्त्वाचा असतो. त्यामुळे तुम्ही तुमचा टॉवेल सूर्यप्रकाशात वाळत घालायला हवा. कारण जर त्या टॉवेलवर काही जंतू असतील आणि तुम्हाला टॉवेल धुणे शक्य नसेल अशावेळी कडकडीत उन्हात टॉवेल ठेवल्यामुळे त्यावरील जीवाणू कमी होतात.

एकट्याने वापरण्याची गरज

शेअरिंग-केअरिंगमध्ये तुम्ही एकाच टॉवेलचा दोन ते तीन जण वापर करत असाल तर ते तुमच्या त्वचेसाठी फारच वाईट आहे. कारण दोन ते तीन जणांनी एकच टॉवेल वापरला तर तुम्हाला संसर्ग होण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळे तुम्ही कधीही एकच टॉवेल दोन ते तीन जणांमध्ये वापरू नका. तुम्हाला त्वचा विकार जडण्याची शक्यता यामध्ये अधिक असते. आता तुम्हाला टॉवेल हा अंघोळीपुरता वाटत असला तरी त्याचे महत्त्व काय ते नक्कीच कळलं असेल, त्यामुळे यापुढे याची अधिक खबरदारी घ्या.

त्वचेच्या संसर्गापासून मुक्ती मिळवण्यासाठी घरगुती उटणे

साहित्य :

एक वाटी मसूर डाळीचे पीठ, कच्चे तांदूळ एक चतुर्थांश कप, आठ बदाम, अर्धा कप गव्हाचा सांजा, चिमूटभर हळद, गुलाबपाणी

कृती व वापरण्याची पद्धत

- मसूर डाळ, तांदूळ आणि बदाम बारीक वाटून त्याची पूड तयार करा.
- या पावडरमध्ये गव्हाची भरड आणि हळद घाला.
- या मिश्रणात पाणी किंवा गुलाबपाणी घालून पेस्ट बनवा.
- ही पेस्ट चेहरा, मान आणि हातावर लावा.
- वाळल्यावर पाण्याने धुऊन घ्या.
- आठवड्यातून एकदा या उटण्याचा वापर करावा.

हे कसे कार्य करते?

त्वचेच्या सौंदर्यवर्धनासाठी प्राचीन काळापासून उटण्यांचा वापर केला जात आहे. हे त्वचेवरील घाण दूर करण्यास मदत करतं. हळदीत आढळणाऱ्या अँटिसेप्टिक गुणधर्मामुळे त्वचेचं संसर्गापासून संरक्षण होतं. बदाम त्वचेचं पोषण करून रंग उजळण्यास मदत करतो.

तब्बल ४० हजार शिक्षकांच्या नोकऱ्या धोक्यात

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

राज्यातील अनुदानित, सरकारी शाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या परंतु त्यांचे आधार लिंक होऊ न शकलेल्या तब्बल ४ लाख २३ हजार ४०८ विद्यार्थ्यांची माहिती समग्र शिक्षण मोहिमेतून जाहीर केली आहे. या माहितीमुळे सुमारे ४० हजारांहून अधिक शिक्षकांच्या नोकऱ्या धोक्यात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

मागील काही वर्षांत अनुदानाच्या विविध टप्प्यांवर आलेल्या शिक्षकांच्या वेतन अनुदानाचाही मोठा प्रश्न यानिमित्ताने समोर येईल, अशी भीती व्यक्त केली जात आहे. समग्र शिक्षण, व राज्य प्राथमिक शिक्षण परिषदेने दिलेल्या माहितीनुसार मागील महिन्याअखेर नोंदविण्यात आलेल्या माहितीनुसार राज्यातील शाळांमध्ये नोंदणी झालेल्या २ कोटी ११ लाख ७९ हजार ६७३ विद्यार्थ्यांपैकी तब्बल ४ लाख २३ हजार ४०८ विद्यार्थ्यांचे आधार लिंक होऊ शकले नाही.

हे विद्यार्थी शाळांमध्ये असले तरी त्यांची नोंद 'युडायस' आदी प्रणालींमध्ये होणार नसल्याने याचा थेट परिणाम सुमारे ४० हजार शिक्षकांच्या नोकऱ्यांवर होणार असून यात सर्वाधिक शिक्षक अनुदानित शाळांतील असतील, अशी भीती तज्ज्ञांकडून व्यक्त होत आहे.

आतापर्यंत सिंधुदुर्ग जिल्ह्यात ९९ टक्के, त्याखालोखाल रत्नागिरी, भंडारा ९८ टक्के, आणि सातारा, वर्धा, अहिल्यानगर, गडचिरोली, कोल्हापूर, गोंदिया, सांगली जिल्ह्यात ९७ टक्केहून अधिक तर उर्वरित जिल्ह्यांमध्ये ९३ ते ९६ टक्क्यांपर्यंत आधार लिंकचे काम पूर्ण झाले आहेत.

यांना सर्वाधिक धोका

राज्यातील सहा हजार ७५ शाळा आणि नऊ हजार ६३१ तुकड्यांवरील ४९ हजार ५६२ शिक्षकांपैकी असंख्य शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या आधार लिंक नसल्याचा फटका बसू शकतो. तसेच नव्याने २० टक्के अनुदानावर पोहोचलेल्या दोन हजार ७२४ शिक्षक आणि शिक्षकेतरही यामुळे मोठ्या प्रमाणात प्रभावित होऊन ते अतिरिक्त ठरण्याची शक्यता आहे.

आधार लिंक आणि दुरुस्ती केंद्रावर शिक्षकांनाच विद्यार्थ्यांसह जावे लागते. वारंवार हेलपाटे घालावे लागतात. आता जन्म दाखल्यावर आईवडील आधार नोंद करा, अशाही सूचना आहेत. काही तांत्रिक अडचणी आहेत. यातील अनेक बाबी शासन नियंत्रणात असल्याने योग्य पर्याय काढणे गरजेचे आहे.

– महेंद्र गणपुले, शिक्षण तज्ञ

वारकरी साहित्य परिषदेची पालघर जिल्हास्तरीय बैठक उत्साहात संपन्न

■बोईसर । प्रतिनिधी,

श्री विठ्ठलाच्या सर्व संतांचे विचार तसेच संत साहित्य समाजातील सर्वांपर्यंत पोहोचवण्यासाठी स्थापन झालेल्या वारकरी साहित्य परिषदेच्या संत जनाबाई मुक्ताई महिला हरिपाठ मंडळाच्या राज्यस्तरीय स्पर्धांचे नियोजनासाठी दि.२४/०७/२०२५ रोजी दत्तमंदिर, दत्तवाडी, बोईसर, जिल्हा पालघर येथे जिल्हास्तरीय बैठक संध्याकाळी ७ वाजता पार पडली.. त्यासाठी जिल्ह्यातील सर्व वारकरी बांधवांना निमंत्रण करण्यात आले होते . हभप. पाहुंरग भोईर महाराज जिल्हा अध्यक्ष,आणि ह.भ.प विनोद महाराज पाटील पालघर तालुका अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीत विविध विषयांवर

चर्चा करण्यात आली. तसेच ह.भ.प. मोहन महाराज सिनलकर डहाणू तालुका अध्यक्ष, ह.भ.प.सौ. शीतल ताई विजय शिंदे , सौ. ह.भ.प.अलकाताई माने यांची उपस्थिती लाभली. सांगली जिल्ह्यातील ह.भ.प. चौगुलेताई आणि वाणी ताई यांनी सूत्र संचलन, मार्गदर्शन आणि अगामी हरिपाठ स्पर्धा विषयी माहिती दिली.बैठकीसाठी पालघर जिल्ह्यातील वारकरी साहित्य परिषदेचे तालुक्यातील संपर्कप्रमुख आणि इतर कमेटी सदस्य हजर होते. वैकुंठवासी मालुश्रीताई पाटील यांच्या संकल्पनेतील संत जनाबाई मुक्ताई महिला हरिपाठ मंडळाच्या राज्यस्तरीय स्पर्धांचे आयोजन करण्याच्या हेतूने बैठकीचे नियोजन करण्यात आले . पालघर जिल्हा महिला अध्यक्ष म्हणून सौ ह.भ.प.शीतल ताई शिंदे तसेच डहाणु तालुका महिला अध्यक्ष सौ. ह.भ.प. अलका माने यांची निवड करण्यात आली. शेवटी ह.भ.प.मोहन महाराज यांनी सर्वांचे आभार मानून कार्यकमाची सांगता अल्पोहाराने करण्यात आली.

डहाणू रोड रेल्वे स्थानकात तोतया टीटीईचा पदार्फाश; सौराष्ट्र एक्सप्रेसमध्ये प्रवाशांची तिकीटे तपासत असताना उघडकीस

■डहाणू । प्रतिनिधी,

पश्चिम रेल्वेच्या डहाणू रोड रेल्वे स्थानकात सौराष्ट्र एक्सप्रेस (१९०१५) मध्ये एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. डहाणू रोड स्थानकावर उभ्या असलेल्या या गाडीत तोतया तिकीट तपासनीस प्रवाशांची तिकीटे तपासत असताना पकडला गेला. कर्तव्यावर असलेल्या वरिष्ठ रेल्वे टीटीई श्याम किशोर प्रसाद यांच्या सतर्कतेमुळे हा प्रकार उघडकीस आला

ही घटना गाडीतील एस-९ कोचमध्ये घडली. संशयास्पद व्यक्ती तिकीट तपासत असल्याचे श्याम किशोर प्रसाद यांच्या लक्षात आले. त्यांनी तत्काळ टीटीई राहुल कुमार आणि प्रशांत यादव यांना माहिती दिली. तिघांनी मिळून त्या व्यक्तीस आरपीएफ कार्यालयात आणले. पुढील चौकशीत संबंधिताने समाधानकारक उत्तर न दिल्याने त्याची सखोल चौकशी करण्यात आली. आरोपीची ओळख किरण सोलंकी (रा. घाटकोपर पूर्व, मुंबई) अशी झाली असून तो रेल्वेचा अधिकृत कर्मचारी नसल्याचे स्पष्ट झाले. यानंतर आरपीएफचे जवान रामोतर मीना, अविनाश पाटील आणि प्रवीण कुमार मीना यांनी आरपीएफ उपनिरीक्षक अरुण कुमार शर्मा यांच्या देखरेखीखाली आरोपीस पालघर येथे नेले. तेथे त्याची वैद्यकीय तपासणी करून जीआरपीने गुन्हा दाखल करत तपास सुरू केला आहे. रेल्वे प्रशासनाकडून प्रवाशांना आवाहन करण्यात आले आहे की, अधिकृत ओळखपत्र असलेल्या टीटीईकडेच तिकीट तपासणीस द्यावी आणि संशयास्पद व्यक्ती आढळल्यास त्वरित रेल्वे सुरक्षा यंत्रणेला माहिती द्यावी.

मूर्तिकारांना शेकडो टन मोफत शाडूचे वाटप अन विनामूल्य जागा

■मुंबई । प्रतिनिधी,

यंदा मुंबई महापालिकेने तब्बल ९१० टन शाडू मातीचे वाटप गणेश मूर्तिकारांना केले आहे. गेल्या वर्षी ५०० टन शाडू माती मोफत दिली होती. यंदा त्याहून ४१० टन शाडू जास्त दिली आहे. महापालिकेने प्रत्येक परिमंडळात १०० टनाहून अधिक शाडू मातीचा पुरवठा केला आहे. त्याचवेळी महापालिका ९९३ मूर्तिकारांना मंडप उभारण्यासाठी विनामूल्य जागा देऊ केली आहे. यंदा शाडू मातीचा पुरवठा वाढल्याने गणेशमूर्तींच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता आहे.मुंबईत पर्यावरणपूरक गणेशमूर्ती बनवण्यासाठी शाडू माती पुरवण्यात आली आहे. तसेच ज्या मूर्तिकारांना आणखी शाडू माती हवी असेल, त्यांनी महापालिकेच्या संकेतस्थळावर नागरिकांकरीता या रकान्यामध्ये अर्ज करा या रकान्यात मंडप (सार्वजनिक गणेशोत्सव/नवरात्रौत्सव/इतर उत्सव) या सदरामध्ये मागणी नोंदवावी, असे आवाहन परिमंडळ २ चे उपायुक्त आणि श्रीगणेशोत्सवाचे समन्वयक प्रशांत सपकाळे यांनी केले आहे.यंदाचा गणेशोत्सव पर्यावरणपूरक साजरा करण्यासाठी महापालिकेने नियोजनासह कृती सुरू केली आहे. महापालिका प्रशासनाकडून विविधा सेवा-सुविधा पुरवल्या जात आहेत. यंदा २५ जुलैपर्यंत ९१० टन २३५ किलो शाडू मातीचे मोफत वाटप करण्यात आले असून के/पूर्व विभागात सर्वाधिक ९६ टन ६१५ किलो शाडू वाटप करण्यात आले आहे.

त्याखालोखाल जी/उत्तर विभागात 91 टन 20 किलो, पी/उत्तर विभागात 82 टन 455 किलो, डी विभागात 74 टन 200 किलो; तर एफ/दक्षिण विभागात 72 टन 600 किलो शाडू मातीचे वाटप करण्यात आले आहे.

मंडपासाठी विनामूल्य जागा

मुंबई महापालिका पर्यावरणपूरक मूर्ती घडवणाऱ्या मूर्तिकारांसाठी विनामूल्य जागा उपलब्ध करून देणार आहे. त्यासाठी प्रथम येणाऱ्या अर्जदाराला प्राधान्य दिले जाणार आहे. एकूण 993 मूर्तिकारांना मंडपासाठी जागा देण्यात येणार आहे. त्यांना मूर्ती घडवण्यासाठी तात्पुरती जागाही मोफत देण्यात आली आहे. विनामूल्य मंडपांमध्ये आर/दक्षिण विभागातून 139, के/पश्चिम विभागात 90 मूर्तिकारांना तसेच पी/उत्तर विभागात 74 आणि पी/दक्षिण विभागात 72 मूर्तिकारांना मंडपासाठी परवानगी देण्यात आली आहे.

कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या बळकटीकरणांसाठी निधी उपलब्ध करून देणार – उपमुख्यमंत्री अजित पवार

■नाशिक । प्रतिनिधी,

राहुरी राज्यातील सर्व कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे आधुनिकीकरण व बळकटीकरण करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान, यंत्रणा उपलब्ध करून देण्याचे शासनाचे धोरण आहे. यासाठी शासन आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यास कटिबद्ध आहे, अशी ग्वाही राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी दिली.

राहुरी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या शेतकरी भवन व उपहारगृहाच्या नव्याने बांधण्यात आलेल्या इमारतीच्या लोकार्पणप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाला आमदार काशीनाथ दाते, माजी आमदार लहू कानडे, कैलास पाटील, डॉ. बाबुराव बापूजी तनपुरे सहकारी साखर कारखान्याचे संचालक ॲड. केरू पानसरे, बाजार समितीचे सभापती अरुणराव तनपुरे, हर्ष तनपुरे, राजेंद्र नागवडे, अशोक सावंत, कपिल पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले, कृषी उत्पन्न बाजार समित्या या शेतकरी व समाजाच्या मालकीच्या संस्था असून, त्या नफ्यात व काटकसरीने कशा चालतील, याचा विचार आवश्यक आहे. शासनाने कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर शेतीमध्ये वाढवण्यासाठी ५०० कोटींची तरतूद केली आहे. कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उसाचे उत्पादन वाढविण्याचा विचार शेतकऱ्यांनी करावा. शेतीमध्ये फळबाग लागवड, तीन पिकांनंतर ऊसाच्या बियाण्यात बदल, आणि शाश्वत पद्धतीचा अवलंब करणे गरजेचे आहे. नवीन पिढीने पर्यावरणपूरक व कचरामुक्त शहर उभारण्यास पुढाकार घ्यावा.

शासनाने पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत महाराष्ट्रासाठी २० लाख घरे मंजूर केली असून या घरांच्या बांधकामासाठी ५ ब्रास वाळू मोफत उपलब्ध करून देण्यात येत आहे. लाडकी बहिण योजनेसाठी यंदाच्या

अर्थसंकल्पात ४५ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, या योजनेचा लाभ केवळ अडीच लाख रुपयांपर्यंत वार्षिक उत्पन्न असलेल्या कुटुंबांतील बहीणींनाच मिळणार आहे; नोकरदार कुटुंबांतील सदस्यांनी या योजनेचा लाभ घेऊ नये, असेही आवाहनही उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी केले. श्री.पवार म्हणाले, राज्यातील ४५ लाख शेतकऱ्यांना मोफत वीज पुरविण्यासाठी २० हजार कोटी रुपये तरतूद करण्यात आली आहे. तसेच शेतकऱ्यांना शून्य टक्के व्याजदराने ३ लाख रुपयांपर्यंत पीक कर्ज उपलब्ध करून दिले जात असून, शेतकरी कल्याणाच्या विविध योजनांसाठी दरवर्षी ५ हजार कोटी रुपयांची तरतूद करून पाच वर्षांत एकूण २५ हजार कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. दिव्यांग लाभार्थ्यांना संजय गांधी निराधार अनुदान योजनेअंतर्गत दिले जाणारे मासिक मानधन दीड हजार रुपयांवरून वाढवून आता अडीच हजार रुपये करण्यात आले आहे. कांद्याच्या खरेदीसाठी नाफेडच्या माध्यमातून शासन कटिबद्ध असून त्यासाठीही आवश्यक ती उपाययोजना करण्यात येत आहे. राज्याच्या उत्पन्नाच्या मयार्देत शासनास कर्ज घेण्याची मुभा असून, देशातील एकूण जीएसटीपैकी महाराष्ट्राचा वाटा १६ टक्के आहे. यातील ५० टक्के म्हणजे ८ टक्के जीएसटीचा वाटा राज्य शासनास प्राप्त होतो.

केंद्र शासनाने पुणे झ अहिल्यानगर नवीन रेल्वे मार्गास मंजुरी दिली असून, भूसंपादन प्रक्रियेद्वारे शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यात येणार असून, त्यांना योग्य मोबदला देण्यात येईल. या मागार्मुळे शेतमालाची वाहतूक सुलभ होणार आहे. शिर्डी विमानतळावर नाईट लँडिंग सुविधा कार्यान्वित करण्यात आली आहे. याठिकाणी सुसज्ज टर्मिनलसाठीही मंजुरी मिळालेली असून, आंतरराष्ट्रीय विमान कंपन्यांद्वारे देश-विदेशातील भाविक शिर्डीत येऊ शकणार आहेत. यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळणार आहे.

राहूरी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कामकाजाचे कौतूक करतांना उपमुख्यमंत्री श्री.पवार म्हणाले, राज्यातील उत्कृष्ट पहिल्या दहा कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये राहुरी बाजार समितीचा समावेश असून, लवकरच वाबूरी येथे १५ एकर जागेत अद्ययावत जिनिंग मिल सुरू करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाच्या प्रारंभी बाजार समितीचे सभापती अरुण तनपुरे यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी सांगितले की, शेतकरी भवन व उपहारगृह इमारतीचे बांधकाम १ कोटी ८० लाख रुपये खर्चून करण्यात आले असून, समितीकडे १९ कोटी रुपयांचे ठेवी आहेत.

'तात्काळ बॅकसीट ड्रायव्हिंग बंद करा...', सरकारचा एअर इंडियाला थेट इशारा, काय आहे प्रकरण?

■मुंबई । प्रतिनिधी,

अक-171 संदभार्तील दुर्घटना आणि त्यानंतर घडलेल्या घटनांक्रमामुळं देशातील विमान सुरक्षा व्यवस्थेवर अनेक प्रश्न उपस्थित केले जात होते. याच पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने टाटा सन्स आणि एअर इंडियाचे चेअरमन एन चंद्रशेखरन यांना थेट इशारच दिला आहे. सरकारने स्पष्ट केलं आहे की, एअर इंडियाच्या विभागात बॅकसीट ड्रायव्हिंग म्हणजेच पडद्यामागून निर्णय घेण्याची संस्कृती संपवण्यात यावी.

नागरी विमान वाहतूक मंत्री राम मोहन नायडू, सचिव समीर कुमार सिन्हा आणि उऋछअ प्रमुख फैज अहमद किदवई यांनी शुक्रवारी एन चंद्रशेखरन यांची भेट घेतली. यावेळी सुरक्षासंबंधीत विविध विभाग जसे, ट्रेनिंग, इंजिनियरिंग, मेंटेनेंस आणि ऑपरेशन कंट्रोल सेंटर यासारख्या प्रमुख सुरक्षा-संबंधित विभागांमध्ये स्पष्ट अधिकार आणि जबाबदारीची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

अधिकाऱ्यांच्या मते, अनेक प्रकरणांमध्ये निर्णय दुसरे कोणीतरी घेत असताना ते तिसऱ्याकडून घेतले जात असतात. ही व्यवस्था धोकादायक आहे आणि ती तात्काळ रद्द करण्याची गरज आहे.

जेव्हा एखादी चूक होते तेव्हा प्रत्यक्षात निर्णय घेणारे लोक पुढे येत नाहीत, एअर इंडियावर ठपका

एका वृत्त संस्थेने दिलेल्या वृत्तानुसार, एअर इंडियामध्ये बऱ्याच काळापासून अशी परिस्थिती दिसून येत आहे की जेव्हा जेव्हा चूक होते तेव्हा प्रत्यक्षात निर्णय घेणारे लोक पुढे येत नाहीत. उलट, क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांना बळीचा बकरा बनवले जाते. क्रू

शेड्युलिंगमध्ये अनियमितता आढळल्याबद्दल डीजीसीएने आधीच तीन अधिकाऱ्यांना काढून टाकले आहे आणि जर निष्काळजीपणा सुरू राहिला तर एअरलाइन बंद होऊ शकते असा इशारा दिला आहे. त्याव्यतिरिक्त सरकारने एअर इंडियाकडून त्यांच्या गुडगाव परिसरात जुन्या क्रॅश झालेल्या विमानांचे भाग जसे की सीट्स, फ्लाइट डेटा रेकॉर्डर इत्यादी प्रदर्शित करण्यावरही प्रश्न उपस्थित केले आहेत. कर्मचापऱ्यांचे म्हणणे आहे की या गोष्टी त्यांना नकारात्मकतेने भरतात आणि ते कंपनीच्या प्रतिमेसाठी आणि मनोबलासाठी हानिकारक आहे.

त्याव्यतिरिक्त सरकारने एअर इंडियाकडून त्यांच्या गुडगाव परिसरात जुन्या क्रॅश झालेल्या विमानांचे भाग जसे की सीट्स, फ्लाइट डेटा रेकॉर्डर इत्यादी प्रदर्शित करण्यावरही प्रश्न उपस्थित केले आहेत. कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे की या गोष्टी त्यांना नकारात्मकतेने भरतात आणि ते कंपनीच्या प्रतिमेसाठी आणि मनोबलासाठी हानिकारक आहे. सरकारचा असा विश्वास आहे की सकारात्मक वातावरण निर्माण करणे महत्त्वाचे आहे. म्हणून ती सुरक्षितता भीतीचे प्रतीक म्हणून नव्हे तर प्रेरणा म्हणून घेतली जाते.

एका वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, एअर इंडियाकडे टाटा आणि सिंगापूर एअरलाइन्ससारख्या भागीदारांसह स्वतःला पुन्हा स्थापित करण्याची सुवर्णसंधी आहे. सरकार सर्व भारतीय विमान कंपन्यांना मदत करू इच्छिते आणि या संकटावर मात करण्यासाठी एअर इंडियाला पाठिंबा देत आहे. सरकारच्या म्हणण्यांनुसार, आज भारतात इंडिगो आणि एअर इंडिया असे दोन मोठ्या कंपन्या आहेत. जे लोक जागतिक स्तरावर देशाला अभिमानास्पद कामगिरी करू शकतात तेच अंतर्गत आव्हानांवर मात करू शकतात.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक – डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय – गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक – डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी – ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com